# मुंबई विद्यापीठ

दिनांक २४ व २५ एप्रिल, २०१९
सकाळी ११:०० वाजता झालेल्या
अधिसभेच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त.

•

**Minutes of the Annual Meeting of Senate held on 24th & 25th April, 2019, at 11: 00 a. m.**

# मुंबई विद्यापीठ

मसुदा

क्र.१/२०१९-२०

अधिसभा

२४ व २५ एप्रिल, २०१९

अधिसभेची वार्षिक सभा विद्यापीठाचे सर कावसजी जहांगीर सभागृह (दिक्षांत सभागृह) येथे बुधवार दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता सुरू झाली. तसेच सदर सभा दुसऱ्या दिवशी गुरुवार दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा सुरु झाली.

सभेसाठी खालिलप्रमाणे एकूण ५९ सदस्य उपस्थित होते :-

| अनु क्र. | सदस्यांचे नाव | २४ एप्रिल, २०१९ | २५ एप्रिल, २०१९ |
|---|---|---|---|
| १ | प्रा. सुहास रघुनाथ पेडणेकर, कुलगुरु अध्यक्ष | उपस्थित | उपस्थित |
| २ | प्रा. रविंद्र दत्तात्रय कुलकणी, प्र--कुलगुरु | उपस्थित | उपस्थित |
| ३ | प्राचार्य (डॉ) मुरलीधर कुऱ्हाडे, प्रभारी अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा | उपस्थित | उपस्थित |
| ४ | डॉ. सुरेश उकरंडे, प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा | उपस्थित | अनुपस्थित |
| ५ | प्राचार्य (डॉ) अजय भामरे, प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा | उपस्थित | उपस्थित |
| ६ | डॉ. रश्मी ओझा, प्रभारी अधिष्ठाता, | उपस्थित | उपस्थित |
| ७ | डॉ. विनोद प्रभाकर पाटील, **संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ** | उपस्थित | उपस्थित |
| ८ | श्री. संजय शहा, वित्त व लेखा अधिकारी | उपस्थित | उपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | अनुपस्थित | अनुपस्थित |
| १० | संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ११ | श्री. भुजंग की. अहिरे, प्रभारी संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र | उपस्थित | उपस्थित |
| १२ | डॉ.सुनिल पाटील, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | उपस्थित | उपस्थित |
| १३ | डॉ. दिलीप एस. पाटील, संचालक, डिपार्टमेंट ऑफ लाईफ लॉंग लर्निंग | उपस्थित | उपस्थित |
| १४ | प्राचार्य डॉ. विठ्ठल सुबराव शिवणकर | उपस्थित | अनुपस्थित |
| १५ | प्राचार्य (डॉ) शाम रघुनाथ जोशी | उपस्थित | उपस्थित |
| १६ | प्राचार्य (डॉ) तुषार मनोहर देसाई | उपस्थित | उपस्थित |
| १७ | प्राचार्य (डॉ) नागेंद्रनाथ बेचन पांडे | उपस्थित | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | प्राचार्य (डॉ) अनुजा नारायण पळसुलेदेसाई | उपस्थित | उपस्थित |
| १९ | प्राचार्य (डॉ) विठ्ठल बळीराम रोकडे | उपस्थित | अनुपस्थित |
| २० | प्राचार्य (डॉ) महादाप्पा गंगाराम गोंडा | उपस्थित | उपस्थित |
| २१ | प्राचार्य (डॉ) धनाजी शंकर गुरव | उपस्थित | उपस्थित |
| २२ | श्री. हृषिकेश गजानन पोळ, | उपस्थित | अनुपस्थित |
| २३ | श्री. संजय बाबूराव शेटे | उपस्थित | उपस्थित |
| २४ | ॲड. निल गिरीश हेळेकर | उपस्थित | उपस्थित |
| २५ | श्री. हसमुख देवजी रांभिया | उपस्थित | उपस्थित |
| २६ | श्रीमती शिल्पा शशिकांत पटवर्धन | उपस्थित | अनुपस्थित |
| २७ | डॉ. सुभाष कृष्णा वाघमारे | उपस्थित | उपस्थित |
| २८ | प्रा. वैभव एकनाथ नरवडे | उपस्थित | उपस्थित |
| २९ | डॉ. अनंत नाना लोखंडे | उपस्थित | उपस्थित |
| ३० | डॉ. चंद्रशेखर सदानंद कुलकर्णी | उपस्थित | उपस्थित |
| ३१ | डॉ. निशा मनोज मुनी | अनुपस्थित | उपस्थित |
| ३२ | प्रा. मोहम्मद ताहिर | उपस्थित | उपस्थित |
| ३३ | प्रा. गुलाबराव बापू राजे | उपस्थित | उपस्थित |
| ३४ | डॉ. रविकांत बालकृष्ण सांगुर्डे | उपस्थित | उपस्थित |
| ३५ | प्रा. रविंद्रनाथ सोन्याबापू रसाळ | उपस्थित | उपस्थित |
| ३६ | प्रा. प्रकाश दामोदर दातार | उपस्थित | उपस्थित |
| ३७ | डॉ. श्रीमती आरती प्रसाद | उपस्थित | उपस्थित |
| ३८ | प्रा. सुरेश नामदेव मैंद | उपस्थित | उपस्थित |
| ३९ | डॉ. संगिता निवृत्ती पवार | उपस्थित | उपस्थित |
| ४० | प्रा. मृदूल जगन्नाथ निळे | उपस्थित | उपस्थित |
| ४१ | श्री. महादेव बाबुराव जगताप | उपस्थित | उपस्थित |
| ४२ | श्री. प्रदिप बाळकृष्ण सांवत | उपस्थित | उपस्थित |
| ४३ | श्री. प्रविण महादेव पाटकर | उपस्थित | अनुपस्थित |
| ४४ | डॉ. सुप्रिया गजानन करंडे | उपस्थित | उपस्थित |
| ४५ | श्री. मिलींद हरीशंद्र साटम | उपस्थित | उपस्थित |
| ४६ | श्रीमती शितल शेठ–देवरुखकर | उपस्थित | उपस्थित |
| ४७ | श्री. निखिल यशवंत जाधव | उपस्थित | उपस्थित |
| ४८ | श्री. धनराज नीळकंठ कोहचाडे | उपस्थित | उपस्थित |
| ४९ | श्री. शशिकांत काशिनाथ झोरे | उपस्थित | उपस्थित |
| ५० | श्री. राजन वसंत कोळंबेकर | उपस्थित | उपस्थित |
| ५१ | श्री. मंदार सावंत देसाई | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५२ | श्री. रविंद्र प्रभु देसाई | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५३ | श्री. धनेश सावंत | उपस्थित | उपस्थित |
| ५४ | श्री. जहांगीर सेथना | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५५ | प्रा. डी.पी. मेहता | उपस्थित | उपस्थित |
| ५६ | ॲड. वैभव थोरात | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५७ | फादर मॅगी मुर्झेलो | उपस्थित | उपस्थित |
| ५८ | श्री. दिपेश मेहता | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ५९ | श्री. राजिव काशिकर | उपस्थित | अनुपस्थित |
| ६० | श्री. सुधाकर शंकर तांबोळी | उपस्थित | उपस्थित |
| ६१ | श्री. रुपेश मालुसरे | उपस्थित | उपस्थित |
| ६२ | श्री. साहेबराव घुले | उपस्थित | उपस्थित |
| ६३ | श्री. सुनिल राऊत, (वि.स.स.) | अनुपस्थित | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ६४ | श्री. संदिप नाईक, (वि.स.स.) | उपस्थित | अनुपस्थित |
| ६५ | ॲड. अनिल परब (वि.प.स.) | उपस्थित | अनुपस्थित |
| ६६ | श्रीमती. गॅस यास्मिन मोहम्मद फाईक, | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ६७ | डॉ. समिर कुलकर्णी, | उपस्थित | उपस्थित |
| ६८ | डॉ. अजय देशमुख,<br>कुलसचिव, सदस्य सचिव | उपस्थित | उपस्थित |

**अनुपस्थिती :—**

डॉ. निशा मुनी, डॉ. जहांगीर सेथना आणि श्री. दिपेश मेहता यांनी सभेसाठी उपस्थिती राहण्याकरीता असमर्थता कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

**श्रध्दांजली :—**

कुलसचिव यांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, व कला इ. क्षेत्रातील अनेक नामवंत व्यक्तींचे निधन झाल्यामुळे समाजाचे व विद्यापीठाचे कधीही भरुन न येणारे नुकसान झाले आहे असे निवेदन केले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील, दापोली ३३ कर्मचारी यांचे आंनबेळी धाटात भीषण अपघाताने निधन झाले, श्री.आर.के. धवन, श्रीमती. शांताबाई काटे, श्री.शांताराम पवार, श्री.अनंत बजाज, मेजर कौस्तुभ राणे, पत्रकार स्वरुप पंडित, श्रीमती जयश्री देशपांडे, श्री. व्ही.एस. नायपॉल, श्री.सोमनाथ चॅटर्जी, श्री. जयवंत नाडकर्णी, श्री. अजित वाडेकर, श्री. अटल बिहारी वाजपेयी, प्रा. फक्रुद्दिन बेन्नुर, केरळ दुर्घटना, श्री. मनिशंकर कवथे, श्री.गुरुदास कामत, श्री. कुलदिप नय्यर, श्री. विजय चव्हाण, जैन मुनी तरुणसागर, श्रीमती. शुभांगी जोशी, श्री.गणपतराव आंदळकर, श्री. दिना खटखटे, श्री. विष्णू खरे, श्री. शांताराम पोटदुखे, श्रीमती. कल्पना लाझमी, श्रीमती. कविता महाजन, श्री. त्यागराज पेंढारकर, पंडित तुळशीदास बोरकर, श्रीमती. कृष्णा कपूर, श्री. कृष्णराव नलावडे, श्री. सुरेश केळकर, श्री. सुहास फडके, पं. डी. के. दातार, श्री. आनंदराव देवकते, श्रीमती. अन्नपुर्णा देवी, पॉल ॲलन, श्री.के.ज.पुरोहित, श्री. एन.डी.तिवारी, श्री. मदनलाल खुराणा, श्री. यशवंत देव, ॲडमिरल मनोहर आवटी, श्रीमती. लालन सारंग, प्राध्यापक अविनाश डोळस, श्री. अनंत कुमार, श्री. अलेक पदमसी, श्री. पाणंदीकर, डॉ. बालाजी वाघमारे, श्री.कृ.पा.सामक, श्रीमती चित्रा बेडेकर, श्री. नाना चुडासामा, श्री. मृणाल सेन, डॉ. यशवंत रारावीकर, श्री. कादर खान, श्री. रमाकांत आचरेकर, श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, श्री. किशोर प्रधान, श्री. शिवाजीराव देशमुख, श्री. लक्ष्मण पाटील, श्री. दत्ता केशव, समाजवादी नेते जॉर्ज फर्नांडिस, श्री. गिरीश वासुदेव, श्री. सुर्या वाघ, श्री. श्रीधर माडगुळकर, श्री. रमेश भाटकर, श्री. अजित सावंत, डॉ.शशिकांत कर्णिक, श्री. मनोहर पर्रीकर, प्रा.डॉ. यशवंत त्र्यंबक पाठक, या सर्व व्यक्तींनी देशासाठी व विविध संस्थांसाठी तसेच विविध क्षेत्रात अनमोल योगदान दिले असल्याचे सांगितले.

यानंतर अधिसभेतर्फे वरिल मान्यवरांच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन सर्व दिवंगतांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

**स्वागत व अभिनंदन :—**

कुलसचिवांनी उपस्थित सर्व अधिसभा सदस्यांचे हार्दिक स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

श्री. महादेव जगताप यांनी नगरपालिका व महानगरपालिका मधून नेमणूक करावयाच्या सदस्यासंदर्भात मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात किती महानगरपालिका व नगर परिषदा आहेत व त्यातील सदस्यांची नेमणूक करते वेळी आरक्षण आहे का? अशी विचारणा केली.

कुलसचिव यांनी एकूण ९ महानगरपालिका तसेच २४ नगरपालिका व ७ जिल्हा परिषदा आहेत तसेच कायद्यात आरक्षाणासंदर्भात कोणतीही तरतुद नाही, असे सांगितले.

कुलगुरुंनी सांगितले की, विद्यापीठ कायदा व परिनियम यांचे तंतोतंत पालन करुन नामनिर्देशन केले जाते.

मा. कुलगुरुंनी नेमलेल्या समितीमध्ये सदस्य कोण होते याची माहिती श्री. महादेव जगताप यांनी विचारली.

लॉट्स पाडण्यासाठी जी समिती गठीत करण्यात आली होती त्यात कुलसचिव, अधिष्ठाता-प्रा. मुरलीधर कु-हाडे, प्रा.डॉ. अजय भामरे, डॉ. सुरेश उकरंडे, डॉ.रश्मी ओझा या पाच जणांचा समावेश होता असे कुलसचिवांनी सांगितले. दिनांक ५ फेब्रुवारी २०१९ रोजी समितीची बैठक झाली त्यामध्ये लॉटस् काढण्यात आले व त्यात उरण महानगरपालिकेच्या बाजुने कल लागला.

श्री. महादेव जगताप यांनी सदर समितीमध्ये प्राचार्य, शिक्षक व पदविधर मतदार संघ प्रतिनिधी यांचा समावेश का नाही? असे विचारले असता कुलसचिवांनी या समितीमध्ये आरक्षण संदर्भात कायद्यात कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे मा. कुलगुरुंनी आपल्या अधिकारात समिती गठीत केली होती, असे स्पष्ट केले.

कुलगुरुंनी सांगितले की, ज्या पद्धतीने अशा ठिकाणी नामनिर्देशन केले जातात तेथे महाराष्ट्र शासन निर्णय, युजीसी आणि विद्यापीठ कायदा या सर्व नियमांचे पालन करुन नामनिर्देशन केले जाते.

सौ. शितल सेठ-देवरुखकर यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करित म्हटले की, आजच्या सभेच्या कार्यक्रम पत्रिकेमधील, 'परिनियम २०८ अन्वये' असा उल्लेख केलेला आहे. जो परिनियम आहे तो विद्यापीठाच्या जुन्या कायद्यानुसार आहे तर आजची सभा जुन्या कायद्याप्रमाणे होत आहे का? महराष्ट्र शासनाचे राजपत्र दिनांक १४ फेब्रुवारी २०१९ रोजी प्रकाशित झालेले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये नविन परिनियम प्रकाशित झालेले आहेत. ते परिनियम विद्यापीठांना दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ पासून लागू होतात. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१५ नुसार राज्यातील सर्व विद्यापीठांना एकच परिनियम लागू करण्याचे अधिकार आहेत; आपण सुरुवातीला सांगितले की अधिसभा ही नविन परिनियमानुसार होणार आहे; परंतु आपण जी कार्यसूची पाठविली आहे ती कार्यसूची जुन्या परिनियमाप्रमाणेच आहे. तसेच अधिसभेसाठी चार प्रश्न पाठविले होते; परंतु त्यांच्या दोनच प्रश्नांचा विचार का करण्यात आला त्याचे उत्तर सौ. शितल सेठ-देवरुखकर यांनी मागितले.

प्रा. डॉ. गुलाबराव राजे यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन परिनियमांचे उल्लघंन करु नये असे आवाहन केले सभागृहाचे कामकाज सुरु झाले असुन या सभागहात सभागहाचे सदस्य नसलेली व्यक्ती देखील बसली आहे का? याचा खुलासा करण्याची विनंती केली तसेच परिनियमांचे उल्लघंन होणार नाही याची जबाबदारी सभागृहाचे प्रमुख या नात्याने मा. कुलगरुंची आहे, असे सांगितले.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन सन्माननीय अध्यक्षांनी सभा सुरु होण्याआधी एक महत्वाची बाब निदर्शणास आणली की, सन्माननीय कुलपतींनी आपल्याला या सभेसाठी एक दिवसाची मुदत दिली आहे आणि त्यामध्ये अर्थसंकल्प व इतर काही विषय आहेत ते एकाच दिवसात संपवायचे आहेत असे पत्र आपल्याला प्राप्त झाले आहे. त्याची प्रत सन्माननीय सर्व सदस्यांना मिळावी व सर्व विषय चर्चेला यावेत आणि अर्थसंकल्प योग्य पध्दतीने सादर व्हावा यासाठी एक दिवस किंबहुना

दुस-या दिवशी सुध्दा सभागृहाचे कामकाज सुरु ठेवावे. तसेच कार्यक्रम पत्रिकेमध्ये ज्या सूची आहेत त्या नविन की जुन्या परिनियमानुसार आहेत, याचा खुलासा करावा. जर नविन परिनियमाप्रमाणे असतील तर अजुन दोन ते तीन बाबी यायला हव्या होत्या. उदा. परिनियमानुसार तक्रार निवारण समितीमधील विद्यार्थ्यांचे विषय येणे गरजेचे होते; परंतु हे सर्व वगळलेले आहेत. ही कार्यक्रम पत्रिका जुन्या परिनियमाप्रमाणे तयार केली आहे.

मा. कुलगुरुंनी स्पष्ट केले की पहिली बैठक आपण २५ मार्च २०१९ ला घेणार होतो त्यानुसार सदस्यांना कार्यसूची पाठविली होती; त्या वेळी जुन्या परिनियमानुसार पाठविली होती कारण नविन परिनियम तोपर्यंत आले नव्हते. आणि कार्यसूची पाठविल्या नंतर नविन परिनियम प्राप्त झाले.

मा. कुलगुरुंनी स्पष्ट केले की, दिनांक २५ मार्च २०१९ रोजी रद्द झालेली सभा आज होते आहे; सभेची मा. राज्यपालांकडून परवानगी घेण्यात आली आहे. विद्यापीठाने लिहिलेल्या पत्राची व राज्यपालांकडून आलेल्या पत्रांची एक प्रत सदस्यांना देण्यात येईल. सभा नविन परिनियमानुसार घ्यावी, असे निर्देश राज्यपाल महोदयांनी दिले आहेत.

मा. कुलगुरुंनी स्पष्ट केले की, प्रश्नोत्तराबाबत नविन परिनियमाप्रमाणे कुलगुरु, कुलसचिव किंवा व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशीत केलेल्या व्यक्तींकडून उत्तरे देण्यात येतील; त्यामुळे येथे कुठलेही उल्लंघन केलेले नाही.

प्रा. वैभव नरवडे यांनी चर्चेत भाग घेताना कार्यसुची आणि सभेचे कामकाज नविन परिनियमानुसार अथवा जुन्या परिनियमानुसार चालविण्यात येईल हा चर्चेचा मुददा आहे. कार्यसूची परिपूर्ण नाही. आजच्या अधिसभेत फक्त लेखा परिक्षण आहे. लेखा परिक्षण अहवाल व वर्षवृत्त सभागहाला समजले पाहिजे.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी विद्यार्थी विकास मंडळ आणि क्रीडा संकुल यांचा आढावा घेतला पाहिजे असे सांगितले व त्याचा कार्यसुचीमधे उल्लेख करण्यात न आल्याबद्दल खेद व्यक्त केला तसेच पुढच्यावेळी योग्य ती काळजी घेणेबाबत अपेक्षा व्यक्त केली.

कुलगुरुंनी सांगितले की, पुर्वी पाठविलेली कार्यसूची तशीच राहिल, फक्त ही सभा नविन परिनियमानुसार घेण्यात येईल.

श्री. महादेव जगताप यांनी, जे प्रश्न विचारले आहेत त्याला अनुसरुन उत्तर द्या, अशी आग्रही मागणी केली.

सौ. शितल शेठ-देवरुखकर यांनी मा. राज्यपालांच्या आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शणास आणले व या संदर्भात त्या मा. राज्यपालांकडे विचारणा करतील असे सांगितले.

कुलसचिवांनी त्यावर स्पष्टीकरण देताना सांगितले की दिनांक ७ फेब्रुवारी २०१९ रोजी अधिसभेची सूचना निर्गमित केली; परंतु नविन परिनियम दिनांक १५ फेब्रुवारी, २०१९ रोजी अस्तित्वात आल्याने व्यवस्थापन परिषदेपुढे आपण केवळ प्रघात म्हणुन तो नोंदविण्यासाठी ठेवला. दिनांक २४ एप्रिल, २०१९ रोजी हाणाऱ्या अधिसभेकरिता पाठविलेल्या सुचनेमध्ये नविन परिनियमाचा उल्लेख अनावधानाने राहून गेला आहे.

श्री. संजय शेटे यांनीही जवळजवळ ३५ दिवसांच्या कालावधीचा उल्लेख केला आणि ही सभा जुन्या परिनियमानुसार घेणे चुकीचे होईल असे सांगितले. नविन परिनियमानुसार अपेक्षित विषयांचा समावेश या कार्यक्रम सुचीतमध्ये नसल्याने ही सभा तहकुब करावी अशी मागणी त्यांनी केली व नविन

शुध्दीपत्रक काढून सभा पुन्हा घेण्यात यावी असे सांगितले. या मताला श्री प्रदीप सावंत यांनीही सहमती दर्शवली.

मा. कुलगुरु यांनी सभासदांच्या भावना समजुन काही तांत्रिक कारणामुळे अशा त्रुटी राहिल्याचे मान्य केले; विद्यापीठ चालविण्यासाठी आर्थिक अडचण येऊ नये यासाठी अर्थसंकल्प मंजुर करणे अनिवार्य असल्याचे सांगितले. मा. राज्यपालांनी या संदर्भातील पत्र सर्व विद्यापीठांना पाठविले असुन त्यांनीच निर्देश दिल्यामुळे त्यांच्या आदेशाचे पालन करणे आपले कर्तव्य आहे. गरज भासल्यास अधिसभा २५ तारखेला सुरु ठेवण्याची अनुमती मागीतली आहे, असे मा. कुलगुरुंनी सांगितले.

मा. कुलगुरुंच्या स्पष्टीकरणानंतरही श्री. प्रदीप सावंत यांनी राजभवनला पत्र पाठवितांना याची काळजी घ्यायला हवी असे पुन्हा एकदा सांगितले व नाराजी व्यक्त केली.

श्री. संजय शेटे यांनी सभा तहकुबीवर पुन्हा-पुन्हा भर दिला. या चर्चेमध्ये श्री. धनेश सावंत व श्री. महादेव जगताप यांनी सभेचे कामकाज नियमानुसार व कायद्यानुसार चालविणे आवश्यक असुन येथे भावनेला काही आधार नसतो असे सांगितले व परिनियमांचा भंग होता कामा नये, अशा सदस्यांच्या भावना असल्याचे सांगितले.

मा. कुलगुरु यांनी सभागहाला विनंती केली की, अर्थसंकल्प मंजुर होण्यास  विलंब झाला तर बरेच अडथळे निर्माण होतील त्यामुळे सदस्यांनी प्रशासनास सहकार्य करावे अशी विनंती केली. वर्षातून दोन पेक्षा जास्त सभा घेण्यास त्यांनी अनुकुलता दर्शविली.

त्यानंतर प्रा. वैभव नरवडे यांनी मराठीला दुय्यम स्थान देण्यात येत असल्याबद्दल  अनेक मुद्दे उपस्थित केले.  श्री. सुधाकर तांबोळी यांनी बैठक तहकुब करायची की नाही यावर बराच वेळ गेला आहे असे सांगितले. ॲड. निल हेळेकर यांनी तांत्रिक मुद्यावर चर्चा करावी अशी सुचना केली. विद्यार्थी विकासासाठी आवश्यक असलेले मुद्दे चर्चेला घेऊन त्यावर तोडगा काढला पाहिजे व यासाठी अजून एक दिवस लागला तरी चालेल असे सागितले.  श्री. संजय शेटे यांनी चर्चेमध्ये पुन्हा हस्तक्षेप करुन विद्यापीठात आर्थिक बाबींना जेवढे महत्व आहे तेवढे विद्यार्थी हितालाही असणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. अजय भामरे यांनी मा. अध्यक्षांना सभेचे कामकाज सुरु करण्याची विनंती केली.

श्री. प्रदिप सावंत यांनी नविन परिनियमानुसार विद्यापीठ तक्रार निवारण समिती व विद्यापीठ कल्याण विभाग व क्रिडा समिती यांचे अहवाल अधिसभेपुढे ठेवणे आवश्यक असलयाचे सांगितले परंतु नविन परिनियमानुसार ठराविक मुदतीत समित्या/मंडळे स्थापित झाल्या नसून या समिती व मंडळात पदवीधर मतदार संघातील कोणताही प्रतिनीधी नेमलेला नसल्याचे निदर्शणास आणले. शिक्षक तक्रार निवारण समितीची बैठक झाली नसल्याची त्यांनी खंत व्यक्त केली व अशा परिस्थितीत अर्थसंकल्पीय बैठक घेण्याचे प्रयोजन काय असा प्रश्न उपस्थित केला. समित्यांची स्थापना कायदयाप्रमाणे करुन या बैठकीचे कामकाज चालवावे, असे त्यानी सूचविले.

सभागृहात अद्याप कार्यक्रम पत्रिकेनुसार सुरुवात न झाल्याने व्यथीत होऊन श्री. संदिप नाईक यांनी अध्यक्ष महोदयांना विनंती केली की सभागृह एक तासाकरिता तहकुब करावे व जे प्रस्ताव आहेत ते या सभेच्या कार्यसुचिमध्ये अंर्तभूत करुन बैठक पुढे चालवावी; परंतु या सभेचा ढाचाच ठरलेला नसल्याने त्यांनी सभा त्याग केला.

श्री. महादेव जगताप यांनीही श्री.संदिप नाईक यांनी मांडलेल्या सुचनेला अनुमोदन देताना सभा एक तास तहकुब करावी याचा पुन:रुच्चार केला.

मा.कुलगुरुंनी सर्व सभासदांना ज्या समित्यांची नेमणुक झालेली नाही त्या तातडीने गठीत करण्यात येतील असे सांगुन सभा सुरु करण्यास सांगितले.

प्रा. वैभव नरवडे यांनी या सुचनेला विरोध करुन प्रस्ताव मांडला गेल्यामुळे त्यावर प्रथम निर्णय घेतला जाऊन मगच सभा चालवता येईल; असा मुद्दा मांडला.

श्री. प्रदिप सावंत यांनी सभा एक तासासाठी तहकुब करावी, याला समर्थन देत विद्यार्थी तक्रार निवारण समितीचे काम कधी सुरु होईल याची तारिख निश्चित होईपर्यंत सभा तहकुब करावी, अशी मागणी केली.

श्री. संजय शेटे यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन, शासनाने विविध परिनियम गॅझेटद्वारे प्रसिद्ध केले असताना जुन्या परिनियमानुसार प्रशासनाने कार्यवाही कशी काय केली? यात राज्यपालांच्या आदेशांचादेखील भंग झाला आहे असे सांगितले. याबाबत मा. कुलगुरुंनी सभागृहात स्पष्ट निवेदन करावे व तोपर्यंत सदर सभा तहकुब करावी अशी मागणी त्यांनी केली.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करताना सांगितले की, परिनियमांचे उल्लंघन सरसकट होत असुन उल्लंघनांची व्याप्ती मोठी आहे. यामध्ये अधिसभेचा अवमान होत आहे. ज्याप्रमाणे आपले मा.सदस्य निषेध व्यक्त करुन सभा त्याग करुन निघुन गेले तसाच सभात्याग आम्हालाही करुन निघुन जावे लागणार आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

प्राचार्य. डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे, यांनी सर्व सभासदांना विनंती केली की, बैठकीच्या कार्यक्रम पत्रिकेला अनुसरुन कामकाज सुरु करण्यात यावे जेणेकरुन आपल्या चर्चेला अर्थ प्राप्त होईल.

डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन सांगितले की, अधिसभा बैठक पुढे सुरु ठेवायची की नाही हा मुद्दा आहे व त्या अनुषंगाने निर्णय घेण्यात यावा.

प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करुन सांगितले की, ही बैठक नियमाला धरुन आहे की नाही याबाबत कुलगुरुंनी कायदेशीर सल्ला घ्यावा; जर ही बैठक विद्यापीठ कायदा व परिनियमाला अनुसरुन नसेल तर आजची बैठक बरखास्त करणे हा एकच पर्याय आपल्यापुढे उरतो. बहुसंख्य सदस्यांनी सभा तहकुब करण्याची मागणी केली. यासंदर्भात प्रशासनाने दिलेली उत्तरे ही समाधानकारक नसल्याचे सांगुन अधिसभेच्या सर्व पदवीधर प्रतिनिधींनी व शिक्षक प्रतिनिधींनी प्रतिकात्मक स्वरुपात ५ मिनिटे सभात्याग केला.

प्राचार्य. डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे यांनी सांगितले की, ही बैठक परिनियमांप्रमाणे ४२ दिवसांची सूचना देऊन आयोजित करण्यात आली होती; निवडणुकीमुळे बैठक पुढे ढकलण्यात आली होती परंतु आचारसंहितेच्या काळातही बैठक घेता येत असल्याचे निर्देश मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ३८५५, २०१९ प्रकरण दिनांक २७ मार्च, २०१९ रोजी दिल्याने पुन्हा अधिसभा बैठकीची नोटीस पाठविण्यात आली तरी या विशिष्ट परिस्थितींचा विचार करुन सभागृहाचे कामकाज सुरु करावे अशी विनंती त्यांनी केली.

डॉ. रश्मी ओझा यांनी, प्रचार्य. डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे यांच्या निवदेनास अनुमोदन देत सभेच्या कार्यसुचीवर कार्यवाही करण्याची सुचना केली.

मा. कुलगुरुंनी सभागृहाला सभा तहकुब करण्याचा प्रस्ताव मागे घ्यावा अशी विनंती केली.

मा. कुलगुरुंच्या आवाहनावर श्री. सुधाकर तांबोळी, श्री. प्रदिप सावंत, डॉ. गुलाबराव राजे यांनी कुलगुरुंना विनंती केली की, एका तासासाठी सभा तहकुब करुन सर्व परिनियमांचे पालन हाईल अशी कार्यसुची निर्गमित करावी व आपण दिलेली आश्वासने कशी व कधी होणार यांची तारिख व वेळ याबाबत निवेदन देऊन मगच सभागृहाचे कामकाज सुरु करावे.

प्रा. रविकांत सांगुर्डे यांनी सदर सभा कोणत्या परिनियमाप्राणे चालेल हे स्पष्ट करण्याची मागणी केली.

मा. कुलगुरुंच्या परवानगीने कुलसचिवांनी सभागृहाचे कामकाज भोजन अवकाशासाठी तहकुब झालेले विषय घोषित केले.

भोजनानंतर तहकुब सभेस सुरुवात झाली.

श्री. कोळंबेकर यांनी अधिसभेत अभिनंदनाचे ठराव मांडण्यात यावेत अशी विनंती केली. निवडणुकीच्या काळात आचारसंहितेचे कारण पुढे करुन अधिसभा रद्द करण्यात आली होती; परंतु अधिसभा सदस्य ॲड. निल हेळेकर यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली व त्याची ही फलश्रुती म्हणून आज ही अधिसभा होते आहे याबाबत ॲड. निल हेळेकर व त्यांचे सहकारी यांच्या अभिनंदनाचा ठराव त्यांनी मांडला त्याचप्रमाणे मा. युवा सेना अध्यक्ष व शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्या कल्पनेतून काही विद्यार्थ्यांच्या तक्रारी आल्यानंतर स्पोर्ट कल्चर किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये तसेच विद्यापीठाच्या कला, क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थी भाग घेत असतात. त्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेण्याकरिता तसेच ज्या परिक्षा एकाच वेळेस होतात त्या परिक्षा पुन्हा घेण्यात याव्यात यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात यावे. यासाठी सन्माननीय सदस्य श्री. प्रदीप सावंत, डॉ. देशमुख, डॉ. विनोद पाटील, डॉ. सुनिल पाटील, डॉ. उत्तम केंद्रे आणि श्री. बाळासाहेब गेळवाई, यांच्या समितीने केलेल्या प्रयत्नांबद्दल देखील अभिनंदन करण्यात यावे, असे निवेदन केले. लता मंगेशकर व सचिन तेंडुलकर यांना विद्यापीठाने डिलिट देऊन सन्मानित करावे या मागणीचा त्यांनी पुन:रुच्चार केला.

मा. कुलगुरुंनी नविन परिनियमानुसार सभेची कार्यसुची अंमलात आणली जाईल ही बाब स्पष्ट करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करण्याचे निर्देश दिले.

बाब क्र. १ पुकारण्या अगोदर ॲड. अनिल परब यांनी मा. कुलगुरुंना आवाहन केले की अधिसभा सदस्यांना असे व्यासपीठ निर्माण करुन द्यावे जेणेकरुन सभासद आपले प्रश्न व व्यथा मांडु शकतील. अधिसभा सदस्यांच्या बैठका तीन महिन्यांनी किंवा गरजेनुसार घेतल्याने बैठकीतील चर्चाही संक्षिप्त राहिल.

प्रा. गुलाबराव राजे यांनी वरिल सुचनेस आपला पाठींबा व्यक्त केला. या संदर्भात मा. कुलगुरु यांनी आधिच दिलेल्या आश्वासनाचा पुर्न:उच्चार केला व अधिसभा सदस्यांची अनौपचारिक बैठक जुलै महिन्यात घेण्यात येईल, असे आश्वासन दिले.

कुलसचिवांनी बाब क्र. १ पुकारली परंतु कार्यसुचिच्या संदर्भात हरकतीचा मुद्दा सौ.शितल सेठ-देवरुखकर, प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी, डॉ.संगिता पवार, श्री. प्रदिप सावंत, यांनी उपस्थित केला. तसेच या सभागृहाची सदस्य नसलेली व्यक्ती सभेत उपस्थित व सभेच्या कामकाजात भाग घेऊ शकते का? हा मुद्दा उपस्थित केला व याबाबत डॉ. गुलाबराव राजे यांनी काही सदस्यांच्या वतीने एक पत्र कुलगुरुंना दिले होते हे नमुद केले.

या संदर्भात सदस्यांनी तीव्र आक्षेप नोंदवले. बहुसंख्य सभासदांचा कल हा सभागृहाचा सदस्य नसलेल्या व्यक्तीने सभेच्या कामकाजात भाग घेण्याबाबत व अर्थसंकल्प सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने दिलेल्या परवानगीच्या विरोधात होता.

सभागृहाचा कल लक्षात घेता मा. कुलगुरुंनी सदस्यांना विनंती केली की व्यवस्थापन परिषदेने सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्प अधिसभेत सादर करण्याचा निर्णय घेतला असल्याने कृपया मान्य करावा.

यावर श्री. प्रदिप सावंत, श्री. संजय शेटे, डॉ. रविकांत सांगुर्डे, प्रा. राजे, श्री. महादेव जगताप, या सदस्यांनी हरकतीचे मुद्दे उपस्थित करुन परिनियमातील तरतुदींकडे लक्ष वेधले.

श्री. धनराज कोहचडे, डॉ. रविकांत सांगुर्डे, डॉ.संगिता पवार, सौ. शितल सेठ-देवरुखकर, श्री. सुधाकर तांबोळी यांनी कोणत्याही परिस्थितीत परिनियम व परंपरा मोडल्या जाऊ नयेत, असा आग्रह धरला.

या सर्व आक्षेपांना मा. कुलगुरुंनी आपण उत्तर देऊ असे आश्वासित करुन सभागृहाचे कामकाज पुढे चालविण्याची विनंती केली.

**<u>बाब क्र. १</u> : दिनांक ३० व ३१ मार्च, २०१८ व २१ जुलै, २०१८ रोजी झालेल्या अधिसभेच्या वार्षिक व विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त संमत करणे.**

इतिवृत्त संमत करण्या अगोदर बहुसंख्य सभासदांना याआधी झालेल्या अधिसभेमध्ये दिलेल्या आश्वासनांची पुर्तता न झाल्याने रोष व्यक्त केला व बहुसंख्य प्रश्न हे तसेच आहेत अशी भावना व्यक्त केली. यामध्ये तासगावकर महाविद्यालयाबद्दलचे प्रश्न, स्थानिक चौकशी नेमताना सर्व घटकांचा अंर्तभाव व विद्यापीठातील कर्मचा-यांच्या विविध सेवा-शर्ती संबधातील प्रश्न, हंगामी सुरक्षा रक्षकांचे प्रश्न, टास्क फोर्सचे प्रश्न, विद्यापीठातील बिंदु नामावलीचे प्रश्न, सेवा निवृत्तीला आलेल्या पण नेट-सेट नसलेल्या शिक्षकांचे प्रश्न, विद्यापीठीय कामकाजातील मराठीच्या वापराबाबतचे प्रश्न, विद्यापीठाने घेतलेल्या परिक्षांचे निकाल व परिक्षांचे प्रश्न असे विविध मुद्दे मांडले.

प्रा. वैभव नरवडे, डॉ. संगिता पवार, डॉ. सुप्रिया करंडे, श्री. सुधाकर तांबोळी, प्रा. गुलाबराव राजे, डॉ. मृदुल निळे, प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी, श्री. महादेव जगताप, श्री. रुपेश मालुसरे, सौ. शितल शेठ-देवरुखकर, डॉ. सुरेश मैंद आणि डॉ. अनंत लोखंडे यांनी याबाबत चर्चेत भाग घेतला

सर्व प्रश्नांमध्ये तातडीने लक्ष घालुन तोडगा काढला जाईल, असे मा. कुलगुरुंनी सांगितले.

कुलसचिवांनी इतिवृत्त मान्यतेसाठी सभागृहापुढे ठेवले असता सभासदांनी ते एकमताने मंजुर केले, यावर मा. कुलगुरुंनी सर्व सभासदांचे आभार मानले.

दि. ३० व ३१ मार्च, २०१९ व २१ जुलै, २०१९ च्या अधिसभेच्या बैठकीचा कार्यवाही अहवाल आयत्यावेळी अधिसभेपुढे सादर करण्यात आला.

कार्यवाही अहवालाला अनुसरुन पेण येथील महाविद्यालयातील लॅपटॉप चोरीचे प्रकरण तसेच सदस्यांच्या प्रश्नांना किंवा पत्रांना १५ दिवसात उत्तरे मिळतील ह्या आश्वासनाचाही उल्लेख नसल्याचा मुद्दा सदस्यांनी सभागृहाच्या नजरेस आणून दिला.

प्राध्यापकांच्या आश्वासित प्रगती योजनेचा मुददा चर्चेला आला असता ऑनलाईन व ऑफलाईन अशा दोन पद्धतीने आश्वासित प्रगती योजनेची प्रकरणे विद्यापीठ शिक्षक नियुक्ती विभागातर्फे छाननी करुन प्रक्रिया सुरु आहे. सहसंचालक यांच्या कार्यालयाकडुन अजुनही कार्यक्रमाचे वेळापत्रक मिळालेले नसल्याने शिबीर घेणे झाले नाही असे कुलगुरुंनी सांगितले. सहसंचालक हे अधिसभेच्या तसेच व्यवस्थापन परिषदेच्याही बैठकांना हजर नसतात असा आक्षेप शिक्षक तसेच पदविधर मतदार संघाच्या प्रतिनिधींकडुन नोंदविण्यात आला.

मा. श्री. बाळासाहेब ठाकरे अध्यासन प्रत्यक्षात आणण्याबाबत होणाऱ्या दिरंगाईबद्दल सभासदांनी नाराजी व्यक्त केली यावर मा. श्री. बाळासाहेब ठाकरे अध्यासना या संदर्भात विद्यापीठाने प्रारुप आराखडा तयार केला असुन त्या संदर्भात कामही सुरु झाले आहे असे कुलगुरुंनी सांगितले.

हंगामी सुरक्षारक्षकांच्या प्रश्नांबद्दल सभागृहाने तीव्र भावना व्यक्त केल्या व त्यांना मिळणारा अपुरा गणवेश, अपुरे वेतन तसेच त्यांच्या बाबतीत केला गेलेला भेदभाव व त्यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये विद्यापीठांने दाखल केलेली याचिका याबाबत सभागृहाने नाराजी व्यक्त केली. त्यांना सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे 'समान काम समान वेतन' द्यावे अशी एकमुखी मागणी

सदस्यांनी केली. त्यावर कुलगुरुंनी आपण यात लक्ष घालून प्रलंबित बाबी लवकरात लवकर मार्गी लावल्या जातील असे सभागृहास सांगितले.

शिक्षकांना कॅप भत्ता मिळण्यात होणारा विलंब व त्यातील अनियमितता याबद्दल प्रशासनाकडुन होणाऱ्या दिरंगाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. या गोष्टीची दखल घेत साधारण महिनाभरात हे सर्व प्रश्न सुटतील असे कुलगुरुंनी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय अभ्यास केंद्र यातील समन्वयक नियुक्ती व त्या संदर्भात केलेल्या आर्थिक तरतुदी याबद्दल सदस्यांनी सभागृहात नाराजी व्यक्त केली. सदर केंद्र लवकरात लवकर सुरु व्हावे ही भावना सदस्यांनी व्यक्त केली. व्यवस्थापन परिषदेपुढे हा विषय मांडण्यात दिरंगाई होत असल्याबद्दल सभासदांनी नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात विद्यापीठाची भुमिका मा. प्र-कुलगुरु यांनी मांडताना हे केंद्र केवळ मुंबई विद्यापीठापुरते मर्यादित न ठेवता त्याचा विस्तार करण्याची योजना असुन लंडन स्कूल ऑफ इकोनॉमीक्स या संस्थेबरोबर त्या संदर्भात चर्चा सुरु आहे असे सांगितले व अशा मोठया स्वरुपात हे केंद्र सुरु होईल असे सांगितले.

विद्यापीठातील आरोग्य केंद्राच्या सद्य परिस्थितीबद्दल सभागृहातील सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात सभागृहात भरपूर आश्वासने देण्यात आली असुन प्रत्यक्षात कोणतेही ठोस पाऊल या केंद्राची स्थीती सुधारण्याबद्दल उचलले गेले नाही. याबाबत मा. कुलगुरुंनी सभागृहास माहिती दिली की दोन प्रसिद्ध डॉक्टर्सनी या केंद्रासंदर्भात पुर्ण आढावा घेतला असुन लवकरच तेथे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्यात येतील.

'शिका आणि कमवा' या योजनेसंदर्भात माहिती देताना संचालक म्हणाले की विद्यापीठ विकास विभागातर्फे या योजनेचे नियोजन करण्यात येत असुन याबाबत परिपत्रक निर्गमित केले आहे.

रत्नागिरी येथील विद्यापीठ उपपरिसर व तेथील परिस्थिती याबाबत मा. सदस्यांनी सांगितले की अजुनही तेथे परीक्षेसंदर्भातील अर्ज स्विकारण्याची सुविधा योग्य प्रकारे उपलब्ध नाही व उपलब्ध सुविधांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. दूरस्थ शिक्षणासंदर्भात आयडॉलचे अर्ज तेथे स्विकारण्याची सुविधा उपलब्ध नाही व तेथील संगणक यंत्रणा धूळ खात पडली आहे. उपकेंद्रांमध्ये सोयी सुविधांची वानवा आहे व हंगामी तत्वावरील प्राध्यापक एम. एस. डब्ल्यू. हे अभ्यासक्रम शिकवतात व तेथे पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शिपायांची कामेदेखील त्यांना करावी लागतात. मायग्रेशन सर्टिफिकेटसाठी त्यांना मुंबईला यावे लागते. ही विसंगत परिस्थिती कार्यवाही अहवालात उल्लेख केल्याबाबत सभासदांनी सभागृहापुढे सांगितले.

कल्याण उपकेंद्राबाबत कार्यवाही अहवालावर चर्चा करताना 'OSM' या उपकेंद्रात सुरु करावे जेणेकरुन तिथे राहणाऱ्या प्राध्यापकांना इतर महाविद्यालयांपर्यंत जाण्याची गरज लागणार नाही. तिथे इतर मुलभुत सोयींची वानवा असुन त्यात लक्ष घालून प्रशासनाने सुधारणा घडवावी. सर्व उपकेंद्रांमध्ये पूर्णवेळ संचालक नेमावेत इत्यादी सूचना मा. सभासदांकडून करण्यात आल्या.

याबाबत कुलगुरुंनी निवदेन करताना सांगितले की या सूचनांचा सकारात्मक विचार करण्यात येईल; कॅप सेंटर सुरु करण्याबाबत शक्यतांची पडताळणी करण्यात येईल. एम.के.सी.एल. संबधीत तक्रारींबाबत लवकारात-लवकर लक्ष घालून निवारण करण्यात येईल; विद्यापीठातील विविध नेमणुकांबाबतची माहिती सभासदांना तत्परतेने पुरवण्यात येईल. सभासदांनी निदर्शनास आणलेल्या प्रकरणांची दखल घेऊन कारवाई होत नाही अशी एक भावना या चर्चेदरम्यान काही सभासदांनी व्यक्त केली यावर आलेल्या तक्रारींची दखल घेऊन योग्य कारवाई करण्याच्या सूचना मा. कुलगुरुंनी कुलसचिवांना केल्या. कार्यवाही अहवालातील task force संबंधातील कार्यवाहीवरिल चर्चेत शासनाकडुन येणे असलेल्या १०० कोटींहून जास्त थकबाकी तसेच प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदान शासनाकडुन मिळविण्यात विद्यापीठाकडुन हाणाऱ्या दिरंगाईबद्दल सभासदांनी तीव्र चिंता व्यक्त केली.

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या दुरावस्थेबद्दलही सभागृहात चिंता व्यक्त करण्यात आली. ग्रुप इन्शुरन्स व वैद्यकीय खर्चाच्या परिपूर्ततिबाबतही सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले. या सर्व प्रश्नांबाबत तातडीने लक्ष घालून शक्य असलेल्या बाबींची पूर्तता करण्याचे आश्वासन मा. कुलगुरुंनी दिले.

कार्यवाही अहवालावर बोलताना शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी असणाऱ्या कल्याणकारी योजनांबद्दल चर्चा झाली. योजना अमलात आणण्यासाठी होणाऱ्या दिरंगाईबद्दल सभासदांनी नाराजी व्यक्त केली. हा प्रश्न अजुनही प्रलंबित असल्याबद्दल सभासदांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन सर्व पद्धतीने विचार करुन सभासदांना याबाबत अवगत करण्यात येईल असे सांगितले.

कार्यवाही अहवालात वरिल चर्चेत अनुभवलेल्या डी.सी.पी.एस. योजने बाबतही असणाऱ्या प्रलंबित बाबी व आमलात आणताना झालेल्या त्रुटींमुळे कर्मचाऱ्यांना व प्राध्यपकांना पडणारा नाहक भुर्दंड या गोष्टी सर्व सभासदांनी आपल्या चर्चेत आणल्या या गोष्टीतील गंभिरता लक्षात घेऊन कुलगुरुंनी यावर एक समिती नेमून या प्रश्नावर तोडगा काढू असे सांगितले.

पी.एचडी. अभ्यासक्रमासाठी नोंदणी शुल्क वाढवल्याबाबत सभासदांनी नाराजी व्यक्त केली; परंतु या प्रश्नावर कुलगुरुंनी नवीन कायद्याप्रमाणे जी शिक्षण शुल्क समिती अस्तित्वात आली आहे त्याकडे हा प्रश्न आपण वर्ग करु, असे सांगितले.

सद्यपरिस्थितीत होणारी परीक्षा मुल्यमापन पद्धती व उत्तर पत्रिका तपासणीची गुणवत्ता या बाबींबाबत चर्चा होऊन काही परीक्षकांनी सातपेक्षा जास्त महाविद्यालयातील पेपर तपासणीचे प्रकरणही चर्चेत आले यावर माननीय प्र-कुलगुरु यांनी सद्यस्थितीत दिवसासाठी जास्तीत जास्त तीस उत्तरपत्रिका तपासण्याची मर्यादा व अपवादात्मक परिस्थितीत शंभर पेपर तपासण्याची मर्यादा असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले यासंदर्भात विधीमंडळातही चर्चा झाल्याने या गोष्टी विद्यापीठाचा मानसन्मान यांच्या दृष्टीने उचित नसल्याचे सभागृहाने कुलगुरुंच्या निदर्शनास आणून दिले यावर आपण योग्य ती खबरदारी घेऊ व आपल्या सर्व सूचनांची योग्य ती दखल घेतली जाईल, असे कुलगुरुंनी सांगितले.

विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांचे वेतन रखडले असल्याचेही या चर्चेदरम्यान सभागृहाच्या निदर्शनाला आणून दिले गेले तसेच विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी जाणाऱ्या स्थानिक चौकशी समित्यांचे अहवालही सदोष असतात व घातलेल्या अटींची पूर्तता केली आहे की नाही हे बघणारी कुठलीही व्यवस्था अस्तित्वात नाही ही बाबही चर्चेदरम्यान उघडकीस आली. यासंदर्भात अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्रश्नांबाबत विद्यापीठ प्रशासन दाखवत असलेल्या उदासीनतेबद्दल सर्व शिक्षक प्रतिनिधींनी आपली नापसंती व्यक्त केली.

विद्यापीठातील संलग्न महाविद्यालयातील प्राचार्य व त्यांच्या पात्रतेबद्दल ही काही नियम डावलल्याची चर्चाही सभागृहात झाली. यासंदर्भात जर सभासदांपर्यंत काही माहिती पोहोचली नसेल तर ती देण्यात येईल, असे कुलगुरुंनी सांगितले.

दि. ३० व ३१ मार्च, २०१८ व २१ जुलै, २०१८ वरिल ठेवलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

मा. कुलगुरुंच्या संमतीने अधिसभेची सभा स्थगित करुन कुलसचिवांनी सभा उद्या सकाळी ११:०० वाजता सुरु होईल असे सांगितले.

**अधिसभेचा दुसरा दिवस**
दिनांक २५ एप्रिल, २०१९

कुलसचिवांनी मा. अध्यक्षांची परवानगी घेऊन स्थगीत सभेचे कामकाज सकाळी ११:०० वाजता सुरु केले.

श्री. दिपक मुकादम यांनी बैठकिच्या सुरवातीस व्यवस्थापन परिषदेने एकमताने अंदाजपत्रक मांडण्यासाठी पाचारण केले होते याचा संदर्भ देऊन त्यांच्या भावना व्यक्त केल्या व अधिसभेला वाटते की मी बजेट मांडु नये त्यामुळे मी बजेट मांडणार नाही, असे सांगितले.

श्री. संजय शेटे यांनी मुंबई विद्यापीठाच्या दैदिप्यमान इतिहासाची आठवण करुन देताना आपण विद्यापीठाच्या चांगल्या कार्यांचा लोकांना परिचय करुन देण्याबाबत कमी पडतो, तसेच सोशल मिडीयाचा आपण जास्त प्रमाणात वापर करत नाही, असे सांगितले.

यावर प्रा. डॉ. मुरलीधर कुऱ्हाडे यांनी अधिसभेमध्ये युक्तीवाद-प्रतीयुक्तीवाद टिका-टिप्पणी हाणे अपेक्षित असते; यामधुन खऱ्या अर्थाने विविध घटकांच्या मनात काय चालले आहे हे आपल्याला समजते. जगामध्ये झपाटयाने बदल होत असतात; आपण आपल्या प्रयत्नाने या बदलाला सामोरे गेले पाहिजे, असे सांगितले.

मा. कुलगुरुंनी सर्व सदस्यांच्या भावनांचा आदर करतो असे सांगुन विद्यापीठाला आपल्या सर्वांकडून अधिकाधिक वेळ मिळावा आणि असलेल्या अनेक अडचणी तुम्ही सदस्य ज्या तळमळीने मांडत आहात त्यातून विद्यापीठाचे भले झाल्याशिवाय राहणार नाही असे सांगितले. अर्थसंकल्पाकरीता श्री. मुकादम यांनी वेळ दिला व खुप मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले व प्राचार्य भामरे हे अर्थसंकल्प मांडतील असे सांगुन प्रश्नोत्तरांचा तास जाहीर केला.

**बाब क्र. २ : प्रश्नोत्तराचा तास**

सदस्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित असल्यामुळे मा. कुलगुरुंनी सांगितले की ज्यांनी प्रश्न लेखी दिलेले आहेत, त्यांनी सुरुवात करावी.

**प्रश्न क्र. १ सौ. शितल शेठ-देवरुखकर**

| | | |
|---|---|---|
| सौ. शितल शेठ- देवरुखकर | : | कुलसचिव पदावर मुलाखत झाल्यानंतर कुलसचिवांचे नाव जाहिर करण्यास विलंब का झाला? निवड समितीच्या सदस्यांनी अहवालावर सहया केल्या का? अमरावती विद्यापीठात डॉ. अजय देशमुख यांची चौकशी करण्यात आली होती का? आणि काही विद्यार्थी संघटनांनी याबाबत माहिती तपासुन घेण्याबाबत प्रशासनाला सूचना केली होती का? असल्यास काही चौकशी केली का? कुलपती कार्यालय आणि आणि मुंबई विद्यापीठातील संबंधीत विषयांशी काही पत्र व्यवहार झाला आहे का? विद्यापीठाने काय खातरजमा करुन घेतली. हे सर्व प्रकरण दडपण्यात आले आहे का? असल्यास संबंधीतांवर काय कारवाई केली याची तक्रार वजा विचारणा केली. |
| श्री. सुधाकर तांबोळी | : | प्रश्न व उपप्रश्न विचारण्यासंबंधीची कक्षा निश्चित झाली पाहिजे प्रश्नांचा क्रम कसा लावला जातो? |
| मा. कुलगुरु | : | प्रश्न जसे विद्यापीठास प्राप्त झाले त्या क्रमाने घेतले आहेत. एखादयाने पुरक प्रश्न किती विचारावे ते अध्यक्ष ठरवतील. हे परिनियमामध्ये स्पष्ट आहे. प्रश्न जास्त वाढत गेले तर सर्वांना संधी मिळणार नाही, मात्र आवश्यकतेपेक्षा जास्त प्रश्न आलेत असे वाटले तर ते थांबवु शकतो. |
| सौ. शितल शेठ- देवरुखकर | : | नियमाप्रमाणे अध्यक्षांनी प्रश्न विचारणाऱ्यांची नावे पुकारली |

| | | |
|---|---|---|
| | | पाहिजेत, तसेच त्यासंदर्भात वास्तविक माहिती मागणे हक्काअंतर्गत येत असेल तर पद निर्देशित केलेल्या व्यक्तीकडुन उत्तर द्यावे. |
| मा. कुलगुरु | : | सदर प्रश्नावर प्रा. अजय भामरे उत्तर देतील. |
| प्राचार्य डॉ. अजय भामरे | : | अमरावती विद्यापीठाकडुन याबाबत कोणतीही चौकशी सुरु असल्याचे कळविण्यात आलेले नाही. विद्यापीठात अर्ज करताना काम करत असलेल्या विद्यापीठाच्या कुलगुरुंमार्फत अर्ज पाठविला जातो व तेव्हा ना हरकत प्रमाणपत्र दिले जाते; मुलाखत होते. नियुक्ती होते; नियुक्तीनंतर नियुक्तीचे पत्र केव्हा घ्यावे याबाबत कोणतेही नियम/प्रघात नाहीत कुलसचिव पदाची मुलाखत झाल्यानंतर दुसऱ्याही काही मुलाखती होत्या. आस्थापना विभागावर कामाचा भार होता. नियुक्तीचे पत्र देताना कोणतीही दिरंगाई झालेली नाही. |
| श्री. महादेव जगताप | : | मुंबई विद्यापीठामध्ये नविन नेमणुका झाल्यावर कर्मचाऱ्यांची पोलिसांकडुन पडताळणी होते का? |
| कुलगुरु | : | विद्यापीठामध्ये अजुन तसा प्रकार नाही आहे. |
| डॉ.सुरेश मैंद | : | दोन तीन दिवस विद्यापीठाबाबत वर्तमानपत्रात बातम्या येत होत्या मग विद्यापीठाने पत्रकार परिषद घेऊन स्पष्टीकरण का दिले नाही? |
| कुलगुरु | : | सूचना योग्य आहे. प्रत्येक वेळी वर्तमानपत्रात बातम्या येत असतात; सर्वांचे स्पष्टीकरण देणे अशक्य असते. |
| सौ.शितल शेठ-देवरुखकर | : | आपण पत्रकार परिषद घेऊन आरोपांचे आणि ताशेऱ्यांचे खंडण करावे. |
| कुलगुरु | : | प्रशासन आपल्या सूचनांचा योग्य तो विचार करेल. |

<u>प्रश्न क्र. २ श्री.राजन कोळंबेकर</u>

| | | |
|---|---|---|
| **श्री.राजन कोळंबेकर** | : | **शिक्षक मान्यता पत्राबाबत आत्ताच सध्यस्थिती समजुन घेता येवू शकते. पक्रियेमध्ये कुठे अडचणी आहे? किती मान्यता प्रलंबित आहेत? असे प्रस्ताव प्रलंबित का आहेत?** |
| मा.कुलगुरु | : | आपल्याला अपेक्षित असलेली प्रलंबित प्रकरणांची माहिती त्याच्यात दिलेली आहे पण वेगळी पाहिजे असल्यास त्याचा विचार करता येईल. सदर प्रश्नावर प्रा. डॉ. कुऱ्हाडे उत्तर देतील. |

सौ. शितल शेठ-देवरुखकर, श्री. महादेव जगताप, श्री. प्रदिप सावंत, श्री. संजय शेटे यांनी,उत्तर कोणी द्यावे यासंदर्भात आपली मते मांडली. श्री. रविकांत सांगुर्डे यांनी कुलगुरु अध्यक्ष आहेत तर त्यांनीच उत्तर द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्राचार्य कुऱ्हाडे : मान्यता प्राप्त प्राचार्य १२८, प्राध्यापक १४, प्रलंबित मान्यता सहायक प्राध्यापक २२३, सहयोगी प्राध्यापक २६ आहेत. त्यामध्ये अनुदानित -विनाअनुदानित अशा प्रकारची माहिती आहे. नियुक्तींच्या संदर्भात काही त्रुटी असतील तर तांत्रिकदृष्टया विलंब होतो, त्याबाबत पत्रव्यवहार करुन कागदपत्रांची जुळवाजुळव करावी लागते; आवश्यक त्या नोंदी घ्याव्या लागतात आणि वरिष्ठांना माहिती द्यावी लागते. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना २२० पानांचे सविस्तर उत्तर दिले आहे.

कुलगुरु : काही माहिती राहिली असेल तर ती नंतर दिली जाईल.

श्री.सुधाकर तांबोळी : प्रशासनाने पहिल्यांदाच चांगली माहिती घरपोच दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

ॲड. निळ हेळेकर : आपल्या मनातील प्रश्न व्यवस्थित मांडले तर उत्तर देणे सोपे जाते. जी उत्तरे आली ती सविस्तर आली आहेत व ते कौतुकास्पद आहे.

श्री. राजन कोळंबेकर : विभाग प्रमुखाचे नाव नाही दिले. ॲप्रुव्हल मिळाले तेव्हा विभाग प्रमुख कोण होते?

प्राचार्य डॉ. कुऱ्हाडे यांनी प्राचार्यांच्या मान्यतेची पद्धत सांगितली.

श्री. महादेव जगताप : किती प्राचार्यांची मान्यता प्रलंबित आहे? याची माहिती दिली नाही.

डॉ. सुप्रिया करंडे : विद्यापीठाने किती प्राचार्यांना मान्यता दिली आहे, किती प्रलंबित आहे, प्रलंबित असल्याचे कारण ऑनलाईन मिळायला हवे.

कुलगुरु : किती प्रलंबित मान्यता आहेत, याची माहिती दिली आहे. *विद्यापीठात दाखल झालेले प्राचार्य, प्रोफेसर व सहायक प्राध्यापक यांच्या मान्यतेचे किती प्रकरणे प्रलंबित आहेत याची माहिती प्रकरण विद्यापीठात दाखल झालेल्या दिनांकासहित, किती मान्य झाले आहेत, विद्यापीठ मान्यतेचा दिनांक व त्या काळात कार्यरत असलेले अधिकारी वर्ग यांच्या नावानीशी सविस्तर माहिती देण्यात यावी.*

श्री. महादेव जगताप, श्री. प्रदिप सावंत, यांनी कुलगुरु, प्र-कुलगुरु यांनी उत्तर दिले पाहिजे व परिनियमाप्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या कोणत्याही एका सदस्याने उत्तर द्यावे, श्री. संजय शेटे, डॉ. रविकांत सांगुर्डे, यांनी कुलगुरु उत्तर देतात असा प्रघात असल्याचे नमुद केले.

कुलगुरु : प्रत्येक प्रश्नाचे उत्तर एक व्यक्ती देईल.

**<u>प्रश्न क्र. ३ प्रा. वैभव नरवडे</u>**

| | | |
|---|---|---|
| **प्रा. वैभव नरवडे** | : | **प्रशासनाने व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या बाबतीत मला माहिती दिली आहे, फक्त ज्या तक्त्यात माहिती दिली नाही, ती देण्यात यावी.** |
| प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी | | ज्या परिक्षांचे निकाल ४५ दिवसात लागले नाही, त्याची कारणे आणि उपाय याबाबत माहिती देण्यात यावी. |
| संचालक,<br>परिक्षा व मुल्यमापन | : | २०३ परिक्षांचे निकाल ४५ दिवसाच्या आत लागले आहेत, काही परिक्षांच्या बाबतीत पेपर तपासणी आणि माहिती संकलनाचे विषय होते म्हणुन विलंब झालेला होता. आता छोटया परिक्षांसाठी वेगळा कर्मचारी वर्ग नेमल्यामुळे पुढे अडचण येणार नाही. |
| प्रा.चंद्रशेखर कुलकर्णी | : | बऱ्याचश्या परिक्षांचे निकाल कालमर्यादा उलटून गेल्यानंतरही लागले आहेत, सुट्टीचा कालावधी लक्षात घेता वेळेवर पेपर तपासणी होईल किंवा नाही यावर फार मोठे प्रश्नचिन्ह आहे. यावर विद्यापीठाने कोणती यंत्रणा तयार केली आहे? |
| मा. कुलगुरु: | : | प्रश्न संयुक्तिक आहे, विद्यापीठ प्रशासनाने यासदर्भात प्रारंभापासुनच योग्य ती पाऊले उचलली आहेत; माहिती संकलनामध्ये अद्ययावतता आणलेली आहे. संबंधित शिक्षकांच्या भेटी घेतल्या आहेत. जिल्हावार नेमणूका केल्याने, तसेच काही छोटया परिक्षा वेगळया करुन त्याची जबाबदारी स्वतंत्रपणे एका व्यक्तीकडे देऊन, तसेच संगणकांची संख्या वाढवुन आणि अधिकाधिक प्राध्यापकांना जोडून निकाल लवकरात-लवकर लावण्यात निश्चितच मदत होईल. |
| प्रा. रविकांत सांगुर्डे | : | ३० एप्रिलला टर्म संपल्यानंतर परिक्षा आयोजनांचा प्रश्न निर्माण होणारा आहे. परिक्षा कोण घेणार? |
| डॉ. रविंद्रनाथ रसाळ | : | पेपर तपासणी उशिरा झाल्यावर निकाल लागल्याशिवाय मुले प्रवेश घेणार नाहीत त्यामुळे अध्यापनाचे कामकाज सुरु होण्यास विलंब हाईल. |
| श्री. प्रदिप सावंत | : | प्रथम व द्वितीय वर्षाच्या परिक्षा महाविद्यालयांकडे द्या. |
| डॉ. सुरेश मैंद | : | ॲकॅडेमिक कॅलेंडर संदर्भात स्पष्टता असावी. |
| प्रॉ. चंद्रशेखर कुलकर्णी | : | ३० एप्रिल पर्यंत ॲकॅडेमिक कॅलेंडर विद्यापरिषदेमध्ये मान्य केले होते, ते अमान्य का केले? |
| मा.कुलगुरु | : | तुम्ही व्यक्त केलेली काळजी रास्त आहे. परंतू यंत्रणेतील आवश्यक बदल एफ वाय, एस वाय, परिक्षा कॉलेजकडे देणे इत्यादींमुळे उशिर झाला पुढे असा विलंब होणार नाही. प्राचार्यांशी संवाद साधून विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल. |

प्रा.रविकांत सांगुर्डे : प्राध्यापकांना सुट्टया मिळाल्या पाहिजेत. सत्र कालावधी वाढविला पाहिजे.

मा. कुलगुरुंनी प्रश्नोत्तरांचा तास संपल्याचे जाहिर केले.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी टेक्निकल विषयावर बराच वेळ गेला असल्याने सदस्यांचे प्रश्न राहिले आहेत त्यासाठी स.सदस्यांना संधी द्यावी. तसेच आपण अर्थसंकल्प सादर करण्यास सांगितले आहे, पण स्थगन प्रस्ताव बाकी आहेत, प्रथेप्रमाणे अर्थसंकल्प शेवटी घेतले जाते. स्थगन प्रस्ताव, कपात सूचना इ. नेहमीच्या पद्धतीने चालले पाहिजे.

मा. कुलगुरु यांनी परिनियमात जसे दिले आहे तसेच आपण जाऊ, असे सांगितले.

श्री. दिपककुमार मुकादम व्यवस्थापन परिषद सदस्य हे प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सभागृहाचे आभार मानुन सभागृहातुन बाहेर पडले.

अर्थसंकल्प आधी सादर करायचा की स्थगन प्रस्ताव व अर्थसंकल्पावरील दुरुस्त्या आधी घ्यायच्या यावर प्रा. मो. ताहिर, श्री. प्रदिप सावंत, श्री. निळ हेळेकर, प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी, श्री. शशिकांत झोरे, यांनी सहभाग घेऊन स्थगन प्रस्ताव आधी घ्यावेत असा आग्रह धरला, त्यावर मा. कुलगुरुंनी सदस्यांच्या भावनांचा आदर करुन स्थगन प्रस्तावांना सुरुवात करु, असे सांगितले.

मा. कुलसचिवांनी एकुण १६ स्थगन प्रस्ताव सदस्यांकडून दाखल करण्यात आलेले आहेत, असे सांगितले आणि विद्यापीठाच्या प्रघाताप्रमाणे समान आशयाचे प्रस्ताव एकत्रित चर्चेला घेतले जातात, हे निदर्शनास आणून दिले.

प्रा. गुलाबराव राजे, डॉ. संगीता पवार आणि श्री. महादेव जगताप यांचे स्थगन प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनातील गैरव्यवस्था, त्यामुळे होणारे परिणाम, परिक्षा, शिक्षकांच्या समस्या, विद्यार्थ्यांच्या समस्या अशा समान विषयांवर असल्यामुळे एकत्र घेण्याचे ठरले.

प्रा. गुलाबराव राजे यांनी खालीलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव : १*

***"That this meeting of the Senate of University of Mumbai be adjourned for ten Minutes to express grave concern of the house at the gross violation of status/norms and arbitrary & undemocratic functioning of the Administration, causing series repercussions on academic, administrative and examination related functioning of University and affiliated colleges."***

प्रा. गुलाबराव राजे यांनी विद्यापीठाच्या नियम, नियमावली, परिनियम व कायदा यांचे उल्लंघन होत असून त्यामुळे विद्याविषयक आणि प्रशासकिय कामांमध्ये गंभीर अडचणी निर्माण होतात असा प्रस्ताव मांडला.

विद्यापीठाच्या कामकाजाबाबत जाणवलेल्या गोष्टी निराशाजनक आहेत. परिक्षांचे निकाल ३० ते ४५ दिवसात लावले पाहिजेत; हे अधिष्ठातांचे कर्तव्य आहे, परंतू त्यांचे पालन झालेले नाही. शैक्षणिक वर्षाचे कॅलेंडर तयार करण्यात आलेले नाही; आर. आर.सी. गठीत केलेली नाही. पुढील परिक्षांचे वेळापत्रक आधीच तयार केले पाहिजे ते दिसत नाही. प्राध्यापकांच्या १५ नैमित्तीक रजेचा मुद्दा अजून स्पष्ट झालेला नाही.

यासर्व मुद्दयांवर चर्चा करताना डॉ. रविकांत सांगुर्डे यांनी काही महाविद्यालयांची नावे सांगून शिक्षकांना वेतन पावती दिली जात नाही, शिक्षकांच्या पगारातून पैसे कापले जातात; परिनियमांचे उल्लंघन होत आहे, असे सांगितले.

प्रा.चंद्रशेखर कुलकर्णी यांनी स्वायत्ततेच्या परिनियमांचे उल्लंघन होत आहे असा मुद्दा उपस्थित केला.

श्री. महादेव जगताप यांनी खालीलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व श्री. प्रदिप सावंत यांनी त्यास अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव-७*

***विद्यापीठ प्रशासनातील गैरव्यवस्था, परीक्षा विभागातील गोंधळ, विद्यापीठ व महाविद्यालयातील नियमबाहय नियुक्त्या, दुरस्थ शिक्षण (IDOL) संस्थेच्या मान्यतेच्या प्रश्नामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला, विद्यानगरी कॅम्पसमधील इमारतींचा प्रश्न, कॅम्पसह अनेक प्रश्न, विद्यापीठाचे NAAC नसल्यामुळे धुळीला मिळालेली प्रतिष्ठा, Ph.d व PET प्रवेशातील गोंधळ, अधिसभच्या निवडणूका, Admission Monitoring com., LIC, प्राचार्यांच्या नेमनुका, विद्यापीठ प्रशासनात बाहय व्यक्तींचा हस्तक्षेप व इतर अनेक विषयावर सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. यासाठी मी स्थगन प्रस्ताव मांडत आहे. कृपया हा स्थगन प्रस्ताव स्विकारावा ही विनंती.***

श्री. महादेव जगताप यांनी विद्यापीठामध्ये असलेल्या अस्थायी स्वरुपाच्या कारभाराबद्दल प्रश्न उपस्थित केला, तसेच विविध समित्यांवर सर्व अधिसभा सदस्यांना संधी दिली पाहिजे. त्याचप्रमाणे पुर्ण वेळ प्राचार्यांच्या नेमणूका झाल्या पाहिजेत, तसेच विभागात निकालासंबंधी विलंब व इतर प्रशासकिय त्रुटींसाठी कोण जबाबदार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये पुर्नमुल्यांकनाबाबतीत विद्यार्थ्यांना नाहक त्रास दिला जातो. विद्यापीठाच्या संचालकाच्या नेमणूका, इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र नसतांना इमारत वापरात आणणे, वसतिगृहात सुविधा उपलब्ध नसणे याचबरोबर रानडे भवनमधील झालेल्या दुर्घटनेचा उल्लेख केला. पेट परिक्षेच्या आयोजनाबद्दल त्यांनी विद्यापीठाचे अभिनंदनही केले. काही नेमणूका जाहिरातींशिवाय झाल्या अशी शंका उपस्थित केली. बिगर नेट-सेट प्राध्यापकांच्या नेमणूका झाल्या याची चौकशी झाली पाहिजे. याशिवाय कलिना परिसरात राहणाऱ्या वसाहतीतील दुरावस्थेचा उल्लेख करुन सेवा कालावधी संपलेले कर्मचारी वसाहतीत राहतात; याचबरोबर मुंबई विद्यापीठात कोणत्याच प्रश्नांची उत्तरे दिली जात नाही.

श्री. प्रदिप सावंत यांनी सलंग्नता शुल्क वसुल करण्याबाबत नेमलेल्या कंपनीने अवघ्या ३३ महाविद्यालयांची माहिती उपलब्ध करुन दिली आहे व इतर महाविद्यालयांकडुन किती रक्कम वसुली झाली, अशी विचारणा केली.

श्री. डि.पी.मेहता यांनी ५५ कोटी रुपयांची वसुली बाकी आहे, ही बाब गंभीर असल्याचे नमुद केले.

डॉ. संगिता पवार यांनी पुढीलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास प्रा.मोहम्मद ताहिर यांनी अनुमोदन दिले.

स्थगन प्रस्ताव-१५

***I hereby forwarded my adjournment motion related to University of Mumbai anomalies of teachers of University departments from their promotional right especially reserved category teachers and some targeted senior general category teachers resulting in grievances. Knowing the gravity and seriousness of their problems, I want the Senate to be adjourned for 10 minutes.***

डॉ. संगिता पवार यांनी शंकरराव चव्हान ट्रेनिंग सेंटरबद्दल सांगताना या ट्रेनिंग सेंटरशी संबंधित नसलेले अभ्यासक्रम संस्थेत चालवले जात आहेत, याकडे लक्ष वेधले तसेच शैक्षणिक कर्मचारी वर्गाला स्थायी स्वरुपात जागा दिल्या आहेत ही बाब चुकीची आहे. R.G.C.C.S. मध्ये दुसरेच लोक अभ्यासक्रम चालवत आहेत व परिनियमाप्रमाणे R.G.C.C.S. चे संचालक हे वरिष्ठ प्राध्यापक हवेत; तेथेही सहयोगी प्राध्यापकांकडुन कामे चालविली जात आहेत; W.R.I.C. व I.C.S.S.R. मध्येही संचालकांच्या नियुक्तीबाबतचा प्रश्न आहे. याच बरोबर संशोधनाचा दर्जा घसरत असून Ph.D. मार्गदर्शकांच्या नेमणूका व मान्यता देण्यामध्ये अनियमितता दिसुन येते. याचबरोबर त्यांनी आरक्षणाच्या नियमांचेही उल्लंघन होत आहे, व काही व्यक्तींवर आश्वासीत प्रगती योजनेबाबत (CAS) अन्याय होत आहे, याकडेही सभागृहाचे लक्ष वेधले.

या स्थगन प्रस्तावाला अनुमोदन देताना प्रा. मोहम्मद ताहीर यांनी विविध सलग्नीत महाविद्यालयांमध्ये परिनियमाचे उल्लंघन होत असल्याचा उल्लेख केला. नैमित्तिक रजा तसेच शिक्षकांच्या मान्यतेप्रकरणी प्रश्न उपस्थित केले. विद्यापीठाने दिलेल्या परिक्षेच्या वेळापत्रकामुळे प्राध्यापकांच्या उन्हाळी सुट्टीवर अतिक्रमण झाले आहे. हे ही सभेच्या निदर्शनास आणून दिले.

प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी अंधेरीमधील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व समाजकल्याण विभागाकडुन अनुदान न मिळाल्याचा उल्लेख केला. तसेच स्वायत्त महाविद्यालयांनी कलम ३५(e) प्रमाणे व ४१ (m) प्रमाणे आपले अभ्यासक्रम प्रमाणित व मान्य करुन घ्यावे लागते, हि गोष्ट अजुनही घडत नाही याकडे लक्ष वेधले व ५ वर्षानंतर स्वायत्ततेचे पुनरावलोकन करण्याकडे लक्ष वेधले.

डॉ. रविंद्रनाथ रसाळ यांनी शासनाकडुन येणाऱ्या ३८३ कोटी रुपयांचा प्रश्न उपस्थित केला; याचबरोबर कलिना परिसरातील वसतिगृहामधील दुरावस्था व उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही प्राध्यापकांना मान्यता दिली नसल्याने प्राध्यापकांची स्थाननिश्चिती रखडली असुन त्यांचा सेवानिवृत्तीचा कालावधी संपत आलेला आहे असे सांगितले.

डॉ. सुरेश मैंद यांनी Ph.D च्या मुद्दयाबाबत सभागृहाला सांगितले की प्रबंधाची प्रत आज विद्यापीठाच्या ग्रंथालयात उपलब्ध नाही तसेच ती पोर्टलवर अपलोड केली जात नाही. Ph.D नोंदणी प्रक्रिया पारदर्शक करण्यात यावी व परिक्षेसाठी येणाऱ्या रेफरीजचे मानधन व प्रवास भत्ता किमान इतर विद्यापीठाच्या बरोबरीने द्यावा, असे सूचविले.

डॉ. प्रकाश दातार यांनी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या असुविधेकडे लक्ष वेधुन, विद्यार्थ्यांकडुन दंडात्मक रक्कम घेतली जाते. महाविद्यालय विकास समिती (C.D.C.) संलग्न महाविद्यालयात स्थापन करण्यात याव्यात व वर्षातुन चार सभा घेतल्या जाव्यात असे कायदयाप्रमाणे बंधनकारक आहे, याकडे लक्ष वेधले.

डॉ. मृदुल निळे यांनी प्राध्यापंकावर झालेल्या तथाकथित अन्यायाचा उल्लेख करताना वाशी येथील एका महाविद्यालयाचा दाखला दिला तसेच राजेश करंकाळ व अमर कडाले यांच्या प्रकरणांचा संदर्भ दिला.

मा.कुलगुरुंनी याप्रसंगी सभागृहाला निवेदन केले की, प्रश्नांची व्याप्ती मोठी असल्यामुळे व प्रश्न अनेक असल्यामुळे आपण अजुन एक सभा घेणार आहोत व त्या व्यासपीठावर आपण ते प्रश्न घेऊ.

मा. कुलगुरुंनी सांगितले की, समर्पक उत्तरे लेखी स्वरुपात दिली जातील.

प्र-कुलगुरुनी सांगितले की, २०१० नंतर ज्या ज्या सुधारणा झाल्या आहेत व प्राध्यापक सामंत यांच्या अध्यक्षेतेखाली नेमलेल्या समितीने ज्या-ज्या सुधारणा सूचविल्या होत्या त्या Academic Council मध्ये संमत झालेल्या आहेत व त्याप्रमाणे सर्व प्रवेश व्हावेत अशा सूचना निर्गमित केलेल्या आहेत. आरक्षणाबाबतीत स्वयं:स्पष्ट सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. समितीने हया संदर्भात विद्यापीठ विभागामध्ये सभा घेतल्या आहे आणि मार्गदर्शक तत्वे निश्चित करुन संशोधन केंद्राकडुन त्यांची उत्तरे घेण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री. महादेव जगताप यांनी PET परिक्षेसंदर्भात तीन वर्षांची मुदत रद्द करणार का? हा प्रश्न उपस्थित करुन प्रबंध सादर करण्यासंदर्भात असलेल्या विलंब शुल्काचा उल्लेख केला व विलंब शुल्क आकारुन विद्यार्थ्यांना पुढे कसे जाता येईल याबाबत विद्यापीठास विनंती केली.

मा. प्र-कुलगुरुंनी यासंदर्भात सांगताना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमांचा उल्लेख करुन शुल्का संदर्भात अधिष्ठाता मंडळ यांच्या बैठकित उपस्थित केल्या जातील व त्याप्रमाणे ते प्रस्ताव शुल्क निश्चिती समितीपुढे ठेऊन त्याचा ऊहापोह केला जाईल.

श्री. प्रदिप सावंत आणि श्री. सुधाकर तांबोळी यांनी दूरस्थ व मुक्त अध्ययन संस्था विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) संपर्कात असून, दूरस्थ व मुक्त अध्ययन संस्थेचा प्रश्न लवकरात-लवकर निकाली लावण्याबाबत सूचना केल्या. दूरस्थ व मुक्त अध्ययन संस्थेचे प्रवेश योग्य पद्धतीने होतील हयाची काळजी घ्या आणि दूरस्थ व मुक्त अध्ययन संस्थासंदर्भात स.सदस्यांच्या मनात प्रश्न असल्याने दूरस्थ व मुक्त अध्ययन संस्थेसंदर्भात एक बैठक घेण्यात यावी, असे सूचविले.

*वरिल तीनही स्थगन प्रस्तावावरिल चर्चेच्या अनुषंगाने मा. कुलगुरूंनी आश्वासित केले की, पुर्ण वेळ अधिष्ठाता नेमणुकीकरता शासनाकडुन परवानगी मिळाली आहे. पदांची जाहिरात दिलेली आहे त्यानुसार लवकरच कार्यवाही करण्यात येईल. कलिना परिसराचा विकास लवकरच सुरू होईल. रस्त्याचे काम सुरू झाले आहे व सुशोभिकरण प्राधान्याने करण्यात येईल. आयडॉल व गरवारे मध्ये चांगले उमेदवार भरती प्रक्रियेमध्ये नाही मिळाले तर भरती प्रक्रिया पुन:श्च परत राबविण्यात येईल. महाविद्यालयात सी.डी.सी. स्थापन करण्यासंदर्भात व सी.डी.सी. अहवाल महाविद्यालयांनी पाठविणे बंधनकारक असल्याचे महाविद्यालयांना कळविले जाईल. सोमय्या, एस.पी. महाविद्यालय व इतर स्वायत्त महाविद्यालयांचे स्वायत्ततेबाबत पुनरावलोकन करण्यासंदर्भात व स्वायत्त महाविद्यालयांनी कायदयाप्रमाणे त्यांचे अभ्यासक्रम विद्यापीठाकडे पाठविले नसल्यास त्यांच्यावर लवकरच कार्यवाही सुरू करण्यात येईल. एस.पी. महाविद्यालय, अंधेरी व पी.डी. कारखानिस महाविद्यालय, अंबरनाथ येथिल महाविद्यालयात शिक्षकांच्या वेतनातुन पैसे कापले जातात, त्यांना सॅलरी स्लीप दिली जात नाही, विचारणा केली तर*

*मेमो दिला जातो, वैद्यकिय अधिका-याच्या प्रमाणपत्रावर आयुर्वेद अथवा दंतचिकित्सालय डॉक्टरांचे असेल तर आक्षेप घेतला जातो. याबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. ॲकडेमिक कॅलेंडरच्या संदर्भात परिक्षा मे महिन्यामध्ये लावल्याने टर्म एक्सटेंड करण्याबाबत प्राचार्यांसमवेत संवाद साधण्यात येणार आहे व याबाबत प्रकुलगुरू व अधिष्ठाता यांची तातडीने सभा बोलावून निर्णय घेतला जाईल. महाविद्यालयांच्या प्रलंबित सलग्नता शुल्काबाबत व्यवस्थापन परिषदेने उच्चस्तरीय समिती नेमली आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर सदस्यांना कळविण्यात येईल. विद्यापीठाच्या रेसिडेंशिअल सदनिकांमध्ये जे-जे सेवानिवृत्तीनंतर नियमबाह्यरित्या राहिले आहेत त्यांना नियमानुसार प्रलंबित शुल्क भरण्याच्या सूचना देण्यात येऊन, सदनिका रिकामी करण्यास सांगण्यात येईल. प्रा. निरज हातेकर यांच्या पी.एच. डी. शोधनिबंधाबाबत गठित झालेल्या समितीच्या अहवालाबाबत यु.जी.सी. च्या नियमाप्रमाणे कार्यवाही सुरू आहे, याची माहिती सदस्यांना दिली जाईल. प्रा. हरिचंदन यांना दिलेल्या पत्राबाबत व श्री.योगेश सोमन यांच्या नेमणुकीबाबत अनियमितता वाटत असेल तर लेखी स्वरूपात कळवा त्याची पडताळणी केली जाईल.*

मा. कुलगुरुंनी प्रा. गुलाबराव राजे, श्री. जगताप, व डॉ.संगीता पवार यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

मा.कुलगुरुंच्या विनंतीला मान देऊन प्रा.गुलाबराव राजे व श्री. महादेव जगताप व प्रा. संगीता पवार यांनी सर्व प्रस्तावांचा एकत्रिक उल्लेख करुन वरिष्ठांकडुन यासर्व गोष्टींवर लवकरच तोडगा निघेल अशी आशा व्यक्त करुन स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

यानंतर मा. कुलगुरुंच्या परवानगीने कुलसचिवांनी भोजनासाठी सभा स्थगित केल्याचे घोषित केले.

भोजनानंतर पुन्हा स्थगित सभेस सुरुवात झाली.

प्रा.चंद्रशेखर कुलकर्णी यांनी खालिलप्रमाणे त्यांचा स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास डॉ. आरती प्रसाद यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव-२*

***"That this meeting of the Senate of University of Mumbai be adjourned for ten Minutes to express deep anguish of the House at the bureaucratic highhandedness; non-transparent & inconsiderate functioning with adverse impact on principles of Equity and Excellence in Higher Education; and worsening plight of student community."***

प्रा.चंद्रशेखर कुलकर्णी यांनी विद्यापीठामध्ये प्रशासकिय आणि विद्याविषयक या दोन्ही गोष्टींचा सर्वात जास्त त्रास विद्यार्थी व शिक्षकांवर होत आहे तसेच परिनियम व कायदयाचा सोयीस्कररित्या अर्थ लावून केलेल्या गोष्टी यासर्व अनर्थाला कारण आहेत. आज जगभरामध्ये दुरस्थ शिक्षण हे प्रभावी माध्यम असताना आपल्या दुरस्थ शिक्षणाबद्दल प्रश्न उपस्थित व्हावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. परिक्षापद्धतीने आपली विश्वासार्हता गमावली आहे. प्रत्येक परिक्षांच्या वेळापत्रकासाठीसुद्धा सुधारित परिपत्रक काढावे

लागते ही गोष्ट भूषणास्पद नाही. सलग्नीत महाविद्यालयाचे शैक्षणिक परिक्षण आजतागायत झालेले नाही. अभियांत्रिकीच्या बाबतीत जवळ जवळ सर्व महाविद्यालयात परिनियमाचे उल्लंघन होत असून कार्यवाही काहीही होत नाही. स्थानिक चौकशी अहवालामधील अटींची पूर्तता झाली की नाही तेहि बघितले जात नाही. समाजकल्याण विभागातून विद्यार्थ्यांचा शुल्क परतावा झाला नसल्याने प्राध्यापकांना वेतनही दिले जात नाही. याबाबतीत मुंबई विद्यापीठाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे? महाविद्यालय विकास समितीचे अहवाल हे विनाअनुदानित स्वयंअर्थार्जित अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी फार महत्वाचे आहे. हे सर्व जर आपण नोकरशाही पद्धतीने हाताळले तर मुंबई विद्यापीठाच्या शिक्षणाची विश्वासार्हता धोक्यात येईल. आपण जी निर्माण केली ती महाविद्यालयेही आज मुंबई विद्यापीठावर संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांच्या बराबरीने असावीत या अपेक्षेने मिळाणारे ८ कोटी रुपये शासनाकडुन मिळणार होते व सदर प्रस्ताव २०१६-१७ मधील निर्देशनाप्रमाणे २४ कोटींची तरतूद करण्यासाठी शासनाकडे पाठविणे अपेक्षित होते हे प्रश्न अजुनही प्रलंबित आहे, ह्याची मुंबई विद्यापीठाने दखल घ्यावी.

डॉ. आरती प्रसाद यांनी विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची तरतुद केलेली असतानाही सदर तरतुदींचा वापर होत नाही. विद्यापरिषदेतील बऱ्याच जागा रिक्त आहेत, बहुतेक वरिष्ठ शिक्षकांना पेपर सेटिंगचे मॉडरेशनचे काम दिले जात नाही. विद्यार्थ्यांना वाढीव गुण देण्याची सुविधा, विविध महाविद्यालयात अर्हताधारक शिक्षक नाहित, असे सांगितले.

प्रा. वैभव नरवडे यांनी सदर प्रश्न विनाअनुदानित महाविद्यालयांच्या बाबतीतही आहे त्यांचाही गांभिर्याने विचार करावा, असे सांगितले.

प्रा. गुलाबराव राजे यांनी सांगितले की, ग्रामिण व दुर्गम प्रदेशात असणाऱ्या ह्या महाविद्यालयांमध्ये मुलींसाठी वसतिगृह असावेत तसेच परिसंवादासाठी सभागृह असावे याप्रकारच्या सोयी असणे गरजेचे आहे; परंतू आजही ह्या महाविद्यालयांची उपेक्षा होत आहे. आंबडवे येथील महाविद्यालयाच्या उभारणीसाठी स्थानिक लोकांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत ह्याचे भान मुंबई विद्यापीठाने ठेवणे गरजेचे आहे. ह्यासंदर्भात तातडीने पाऊले उचलावित.

श्री. मिलिंद साटम यांनी चर्चेत भाग घेताना सूचविले की, सलंग्न महाविद्यालयात शैक्षणिक समता कुठेही दिसुन येत नाही यासंदर्भात त्यांनी जम्मु-काश्मीरमध्ये सुट्टी घालवणाऱ्या विद्यार्थीनीला परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्रही देण्यात आलेले आहे; त्याचबरोबर कित्येक महाविद्यालयांमध्ये पद्व्युत्तर अभ्यासक्रम योग्य ते प्राध्यापक नसतानाही सुरु झालेले आहेत व ते तेथील विद्यार्थ्यांच्या तक्रारी आहेत त्याची दखल मुंबई विद्यापीठाने घ्यावी.

मा. कुलगुरु यांनी विद्याविषयक बाबींवरील प्रश्नाला प्र-कुलगुरु उत्तर देतील, असे सांगितले.

प्र-कुलगुरु यांनी सांगितले की, अभियांत्रिकिमध्ये ए.आय.सी.टी.ई ने जे अभ्यासक्रमाचे अनुरुप आराखडे बनविले आहेत त्याची विद्यापीठाने दखल घेतली आहे. विदेशी विद्यापीठासारखेच क्रेडिट कोर्सेस आपल्याही अभ्यासक्रमात राहतील; ह्याबाबतीत विद्यापीठ जरुर विचार करेल; अभ्यासमंडळाच्या ४१(a) व ४८(h) प्रमाणे परिक्षासंदर्भातील नेमणूका पदव्युत्तर विषयाच्याबाबतीत केल्या जातील. गुणवत्ता परिक्षण मंडळ बनविले जात आहे त्याद्वारे आपण पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे नियमन करु. आदर्श महाविद्यालयांच्या संदर्भात समिती स्थापन करण्यात आली आहे व त्या समितीने त्या महाविद्यालयांना भेटीही दिल्या आहेत. ह्या महाविद्यालयांच्या संदर्भात नाविण्यपुर्ण अभ्यासक्रम ज्याला विद्यार्थी उपलब्ध होतील. ध्वनी अभियांत्रिकी यासारखे अभ्यासक्रम तिथे राबविले जातील.

मा. कुलगुरु यांनी सांगितले की, तळेरे महाविद्यालयात बॅंक ऑफ महाराष्ट्र बरोबर सामंजस्य करार करुन त्यांच्या सहकार्याने प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरु करण्यात आला व **'कमवा व शिका'** या योजनेअंतर्गत त्यांना फायदा होत आहे. सदर महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना राबविण्यात येत

आहे व त्या विद्यार्थ्यांना हाताशी धरुन नजिकच्या गावात पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

श्री. मिलिंद साटम यांनी मा.कुलगुरुंकडून आश्वासन देण्याचे आवाहन केले ज्यामुळे १८० दिवस पूर्ण शिकायला मिळेल व कुठेही परिक्षेचे अतिक्रमण होणार नाही.

प्र-कुलगुरुंनी यावर प्रतिक्रिया व्यक्त करत सूचविले की, २०१७ मध्ये काही अपरिहार्य गोष्टींमुळे हया गोष्टी घडल्या परंतू हया गोष्टी परत घडणार नाहीत. *अभ्यासक्रमांचे अध्ययन पूर्ण न झाल्याने होणारे नुकसान पुढील शैक्षणिक वर्षापासुन होणार नाही. शिक्षकांना शिकविण्यासाठी १८० दिवस मिळतील, असे आश्वासन प्र-कुलगुरुंनी दिले.*

मा. कुलगुरु हयावर प्रतिक्रिया देत म्हणाले की, आपण आपल्या बाजुने प्रयत्न करुया *B.Ed. महाविद्यालयाविषयी लेखी तक्रार दिल्यास त्याची दखल घेतली जाईल. कॉलेजसंदर्भात काही तक्रार असेल तर त्याची तात्काळ दखल घेतली जाईल.*

प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी, यांनी सांगितले की, आदर्श महाविद्यालय तळेरे व आंबडवे येथील इमारत बांधकाम थांबले आहे. त्याबाबतीत मुंबई विद्यापीठाने ठोस आश्वासन द्यावे, अशी विचारणा केली.

मा. कुलगुरुंनी सांगितले की, *आंबडवे येथील महाविद्यालयात विद्यार्थी जास्त प्रमाणात येण्यासाठी तेथे कुठल्या प्रकारच्या अभ्यासक्रमाची गरज आहे याचा आढावा घेतला जाईल व वसतिगृहासाठी प्रयत्न केला जाईल. तसेच तेथील सुविधा सुरु करण्याचे आदेश दिले गेले. त्या एव्हाना पूर्णत्वाकडे गेल्या अशी अपेक्षा आहे, पाहोचमार्ग देखील आता उपलब्ध झालेला आहे. आंबडवे येथे महाविद्यालयाच्या जागेसाठी ज्यांनी-ज्यांनी जमिनी दिल्या त्यांना कायमस्वरूपी नोकरी मिळेल असे आश्वासन दिलेले असल्याने या वचनाच्या पूर्ततेसाठी प्राचार्य कुऱ्हाडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे त्यांना लवकरच अहवाल सादर करण्यास सांगितला आहे व याबाबत अहवाल प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल.*

मा. कुलगुरुंनी प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली.

मा. कुलगुरुंच्या विनंतीला मान देऊन प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी आपला स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

प्रा. वैभव नरवडे यांनी खालिलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव-३*

***"विद्यापीठ प्रशासनाच्या सुस्त कारभारामुळे शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रलंबित रहात आहेत. मुंबई विद्यापीठाने सदर प्रकाराची गांभीर्याने दखल घेवून सभागृहाचे कामकाज १० मिनिटे स्थगित करण्यात यावे."***

प्रा. वैभव नरवडे यांनी शिक्षकांचे/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न मांडले. उदा. विद्यापीठाच्या प्राध्यापकांचे CAS झालेले नाही त्यांचे पैसे परत मिळावेत, BOS च्या निवडणूका झालेल्या आहेत; परंतु त्यांना व Ad-hoc बोर्डांना पत्र गेलेली नाहीत, तक्रार निवारण समिती गठीत नाही. सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन लागु करण्यासाठी समिती गठीत करावी. नॅनोटेकनोलॉजीमध्ये काम करणाऱ्या उच्चशिक्षित कर्मचाऱ्यांचे वेतन बरेच महिने दिलेले नाही. नविन अभ्यासक्रमाची मान्यता, विनाअनुदानित शिक्षकांची मान्यता, ग्रज्युइटी पेन्शन,प्लॅगारिझमविषयी कार्यवाही वरिष्ठ अधिकाऱ्यांना कनिष्ठ अधिकाऱ्यांचा अतिरिक्त कार्यभार देणे, इत्यादी विषय सभेपुढे आणले.

त्यात डॉ. सुप्रिया करंडे, प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी, श्री. प्रदिप सावंत यांनी सदर चर्चेत सहभाग घेतला.

मा. कुलगुरुंनी यासर्व प्रश्नावर आश्वासित केले की, *सातव्या वेतन आयोगाबाबत महाविद्यालयांना कळविले आहे व याबाबत समिती गठीत करण्यात येऊन शासनाकडे प्रस्ताव पाठविले जातील, जेवढे Ad-hoc Board बाकी आहेत तेवढे Ad-hoc Boards गठित करून Ad-hoc Board सदस्यांची नावे कळविली जातील, शिक्षकेत्तर कर्मचा-यांची ग्रॅज्युइटी/पेंशनचा जुना प्रलंबित असलेला प्रश्न आहे यामध्ये सिनिअर ऑडिटर्स यांना बोलावुन कसा मार्ग काढता येईल यासाठी प्रयत्न सुरू आहे. अनुदानित-विनाअनुदानित रोस्टर न बनविले गेल्यामुळे यात बरिच क्लिष्टता आली आहे. मंत्रालयामध्ये याबाबत बैठकी झाल्या आहेत त्यातुन बऱ्याच गोष्टी निकाली निघतील, नॅनो सायन्स मध्ये काम करत असलेल्या सिनेकलावंताच्या उच्च शिक्षित मुलाला गेले सहा महिने काम करूनही पगार मिळाला नाही, यावर कार्यवाही सुरू आहे. प्लॅगरिझम विषयी कार्यवाही सुरू आहे* यानंतर कुलगुरुंनी प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली, त्यानुसार वैभव नरवडे यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

श्री. मिलिंद साटम यांनी खालिलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास प्रा. वैभव नरवडे यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव-४*

***मुंबई विद्यापीठ व युजीसी अनेक महाविद्यालयांना स्वायत्तता देत आहे, यामुळे अनेक महाविद्यालयांची मनमानी सुरू आहे. फी मध्ये भरमसाठ वाढ होत आहे, गरीब मुलांना प्रवेश घेणे दुरापास्त झाले आहे, असेच कॉलेजेस स्वायत्त झाल्यास एक दिवस मुंबई विद्यापीठाची स्थिती मुंबई महापालिकेच्या शाळेसारखी होणार; मुंबई विद्यापीठ हळूहळू बंद करण्याचा हा एक डाव आहे.***

***या व यासंदर्भात इतर अशाच विषयावर मी सभागृहाचे कामकाज स्थगित करावे यासाठी मी स्थगन प्रस्ताव मांडीत आहे.***

***कृपया, हा स्थगन प्रस्ताव स्वीकारावा ही विनंती.***

श्री. मिलिंद साटम यांनी स्वायत्त महाविद्यालयांची वाढती संख्या आणि त्यांचे मुंबई विद्यापीठावर होणारे दुरगामी परिणाम यावर स्थगन प्रस्ताव मांडला. स्वायत्त महाविद्यालयांची संख्या वाढल्याने विद्यार्थी, शिक्षक व विद्यापीठ यावर कसा विपरित परिणाम होउ शकतो याबद्दल माहिती दिली. स्वायत्त महाविद्यालयांची आकडेवारी त्यांनी सभागृहापुढे मांडली. स्वायत्त महाविद्यालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठीची मुंबई विद्यापीठाकडे यंत्रणाच नाही यावर श्री.मिलिंद साटम यांनी भर दिला.

या चर्चेत श्री. राजन कोळंबेकर, श्री. दिपक सावंत, श्री. महादेव जगताप, प्रा. गुलाबराव राजे इत्यादींनी सहभाग घेतला

श्री. राजन कोळंबेकर यांनी सूचना केली की जर नविन अभ्यासक्रम हा इतर विद्यार्थ्यांना उपयोगी पडू शकतो, तर तो इतर महाविद्यालयात देखील राबवता येऊ शकतो.

श्री. प्रदिप सावंत यांनी स्वायत्त महाविद्यालये आपल्या गुणपत्रिकेवर विद्यापीठाचा लोगो का वापरतात? यावर प्रश्न उपस्थीत केला.

श्री. महादेव जगताप यांनी सूचना केली की जर स्वायत्त महाविद्यालये सक्षम असतील तर मुंबई विद्यापीठाचे दिक्षांत समारोहाचे प्रमाणपत्र कशाला घेता?

मा. कुलगुरुंनी यावर अधिक माहिती देत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) नियमाप्रमाणे स्वायत्तता देणे क्रमप्राप्त असल्याचे सांगितले

श्री. वैभव नरवडे यांनी श्री. मिलिंद साटम यांच्या वरील विषयावरील मांडलेली आकडेवारी आणि अभ्यासपूर्वक केलेल्या मांडणीबद्दल अभिनंदन केले.

*श्री. मिलिंद साटम यांच्या स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने, कुलगुरुंनी स्वायत्त महाविद्यालयाच्या गव्हर्निंग बॉडीवर जे विद्यापीठाचे प्रतिनिधि जातात त्यांनी त्या त्या महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल देणे गरजेचे आहे, तसे त्यांना कळविण्यात येईल, असे आश्वासन दिले. श्री. राजन कोळंबेकर यांच्या सूचनेच्या अनुषंगाने, कुलगुरुंनी सांगितले कि, स्वायत्त महाविद्यालयात एखादया विषयाचा अभ्यासक्रम चांगल्या पद्धतीने केलेला असेल तर सदर अभ्यासक्रम विद्यापीठामार्फत इतर महाविद्यालयाला शिकवला जाऊ शकतो, सर्व अभ्यास मंडळांना याबाबत कळविण्यात येईल. स्वायत्त महाविद्यालयासंदर्भात काही तक्रारी आढळल्यास त्यावर उचित कार्यवाही केली जाईल. ज्या महाविद्यालयात विद्यापीठाच्या नियमानुसार शुल्क न घेता जास्त शुल्क घेतले जाते अशा महाविद्यालयांची लेखी तक्रार आल्यास उचित कार्यवाही करण्यात येईल. आयडॉलच्या विद्यार्थ्यांची परिक्षा व मुंबई विद्यापीठाच्या पारंपारिक विद्यार्थ्यांची परिक्षा एकत्रितपणे होणे गरजेचे आहे. महाविद्यालये सेंटर देत नसल्यास त्यांच्या नेमक्या अडचणी काय आहेत? हे समजून त्यावर उपाय काढला जाईल.*

वरिल आश्वासनानंतर श्री. मिलिंद साटम यांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती कुलगुरुंनी केली असता श्री. मिलिंद साटम यांनी मा.कुलगुरुंच्या विनंतीला मान देऊन सदर स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

डॉ.सुप्रिया करंडे यांनी खालिलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास श्री. प्रदिप सावंत यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव-६*

***मुंबई विद्यापीठात विद्यार्थी कुठे आहे? विद्यार्थी केंद्रित विद्यापीठात विद्यार्थ्यांची ससेहोलपट थांबवा आणि शैक्षणिक मार्ग सुकर करण्यासाठी ही सभा १० मि. तहकूब करा.***

डॉ. सुप्रिया करंडे यांनी सांगितले की मुंबई विद्यापीठाचा भार आणि व्याप्ती प्रचंड आहे; परंतु मुंबई विद्यापीठ विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यात सतत अपयशी ठरत आहे; बरेचसे सिनेट सदस्य आपणाला प्रशासनामध्ये मदत करायला तयार असतानादेखील आपण आम्हाला सोबत घेत नाहीत. वेगवेगळया समितीमध्ये प्राधान्य देणे गरजेचे आहे असेही त्यांनी नमुद केले.

श्री. प्रदिप सावंत यांनी देखील डॉ. सुप्रिया करंडे यांच्या मताला सहमती दर्शवली. तसेच एल.एल.एम. च्या विद्यार्थ्याला १० गुणांवरुन ४८ गुण आणि ते सुद्धा फक्त अर्ज केल्यानंतर अवघ्या २ दिवसात कसे काय घडले? असे विचारत उत्तर मागितले.

डॉ. सुनिल पाटील यांनी विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, विद्यार्थ्यांसाठी आयोजित असलेले कार्यक्रम, महोत्सव, ट्रेनिंग, व्यक्तीमत्व व विकास कार्यशाळा, स्पर्धा परिक्षा तसेच प्रत्येक महाविद्यालयात मुलींसाठी सेल्फ ट्रेनिंग कॅम्प, अविष्कार महोत्सवात केलेली कामगिरी, ऑनलाईन अटेस्टेशन, स्कॉलरशिपचे नियोजन ईत्यादी विषयींची माहिती दिली.

श्री. धनराज कोहचाडे यांनी SC/ST/OBC विद्यार्थ्यांना सुविधा देण्याबाबत, पी.एच.डी. विद्यार्थ्यांच्या सुविधा, ST विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह इत्यादी बाबात विचारणा केली.

या चर्चेत श्री. महादेव जगताप, श्री. सुधाकर तांबोळी, श्री. राजन कोळंबेकर यांनी सहभाग घेतला.

डॉ. सुप्रिया करंडे यांच्या स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने, कुलगुरुंनी सांगितले की, त्यांनी 'विद्यार्थी संवाद' साधण्यासाठी सिंधुदूर्ग व पनवेलमध्ये बैठक घेतली. त्याचप्रमाणे पालघर व मुंबईमध्ये बैठक घेतली जाणार आहे. तसेच व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधला जाईल हे देखील बघितले जाईल. परीक्षा भवना मध्येही विद्यार्थ्यांशी संवाद साधला जाईल. अधिसभा सदस्य देखील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी त्यावेळी येऊ शकतात व एकत्रितपणे संवाद साधून विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. परीक्षेशी निगडीत एक ॲप बनविला असून. त्याात योग्य ते बदल घडवून लवकरात लवकर एक नविन ॲप बनविले जाईल जेणेकरून विद्यापीठाशी संबंधित सर्व माहिती विद्यार्थ्यांना ॲप वर मिळेल. यासाठी अधिसभा सदस्य श्री. प्रविण पाटकर हे सहकार्य करणार आहेत. तसेच इतर अधिसभा सदस्य जे तंत्रज्ञानात तज्ज्ञ आहेत त्यांनीही या कामात पुढाकार घ्यावा. मुंबई विद्यापीठाचे कॉल सेंटर असावे जेणेकरून विद्यार्थ्यांच्या बऱ्याचशा अडचणी निकाली निघतील यासाठी प्रयत्न करण्यात येईल. विद्यापीठात इतर गठीत होणाऱ्या समितींवर उदा. पडताळणी समिती, स्थानिक चौकशी समिती व इतर अवैधानिक समिती वर आवश्यक तिथे योग्य त्या प्रमाणात अधिसभा सदस्यांना घेतले जाईल. एल.एल.एम.च्या विद्यार्थ्यांचे गुण १० वरून ४८ झाले आहेत त्याबद्दल अध्यादेशातील तरतुद तपासुन पुर्नमुल्यांकन योग्य प्रकारे करण्यात आले आहे किंवा कधी याची चौकशी केली जाईल.

वरिल आश्वासनानंतर डॉ. सुप्रिया करंडे यांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती कुलगुरुंनी केली असता डॉ. सुप्रिया करंडे यांनी मा.कुलगुरुंच्या विनंतीला मान देऊन सदर स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

सौ. शितल शेठ-देवरुखकर व श्री. राजन कोळंबेकर, प्रा. वैभव नरवडे यांचे प्रस्ताव समान विषयावर असल्यामुळे एकत्रित घेण्याचे ठरले.

सौ. शितल शेठ-देवरुखकर यांनी खालिलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव - ९*

*मुंबई विद्यापीठामध्ये अनेक वर्षापासून शिक्षकांचे /प्राचार्यांचे प्रस्ताव पडून राहणे, त्यामुळे शिक्षक वर्गात असंतोष निर्माण होणे, विद्यापीठ प्रशासनातर्फे ठराविक प्रस्ताव जलद गतीने व चुकीच्या व नियमबाह्य पद्धतीने मान्य करणे त्यामुळे शासनाच्या व विद्यापीठाच्या तिजोरीवर मोठा आर्थिक भार पडणे, नियमबाह्य शिक्षक मान्यतेची बाब लक्षात येणे व त्यानुसार मान्यता रद्द करणे आणि आता पुन्हा बेकायदेशीर मान्यता देण्याचा आटोकाट प्रयत्न करणे हि बाब अतिशय गंभीर असल्याकारणाने याकडे सभागृहाचे लक्ष वेधण्यासाठी हे सभागृह स्थगित करण्यात यावे.*

सौ. शितल शेठ-देवरुखकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, प्राचार्यांच्या नेमणूका हया अतिशय बेजबाबदारपणे झालेल्या आहेत. नेमणूकांमध्ये पारदर्शकता नाही. कुठल्यातरी दबावाला बळी पडुन आपल्या मर्जीतल्या लोकांसाठी कायदे नियमांची पायमल्ली करुन नेमणूका करण्यात आल्याबाबत काही उदाहरणे दिली.

घनश्यामदास सराफ महाविद्यालयाच्या प्राचार्या पात्र नसताना त्यांची नेमणूक झाली. २७ वर्षानंतर त्यांची पात्रता चुकीची ठरवण्यात आली. पुन्हा त्यांना पात्र करण्यात आले. याचा अर्थ पहिली समिती ज्यांनी नेमणूक केली त्या समितीचा निर्णय योग्य अथवा ज्या समितीने अपात्र ठरवले त्या समितीचा निर्णय योग्य? कोण बरोबर ते ठरवा; जे. एन. पटेल महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मान्यतेस एक वर्षाची का दिरंगाई झाली? दहिसर येथील शैलेंद्र महाविद्यालयामध्ये ६ उमेदवारांपैकी ५ उमेदवारांना फोन करुन प्रेरणाहिन केले; विलेपार्लेचे महाविद्यालय येथे जाहिराती दिल्या जातात पण मुलाखत घेतली जात नाही. प्राचार्यांची नेमणुक होत नाही. प्राचार्य स्नेहल दोंदे यांच्या मान्यतेविषयी २०१५ पासुन चालढकल होत आहे. तसेच बदलीची प्रक्रिया व्यवस्थित राबविली जात नाही. त्यामुळे बरेचसे अधिकारी एकाच ठिकाणी बऱ्याच वर्षापासुन असतात त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. १९०० हुन अधिक प्रकरणे प्रलंबित होती, याला कोण अधिकारी जबाबदार आहेत? या सर्व प्राचार्यांच्या मान्यतेची प्रकरणे पडताळणी करण्यासाठी एक समिती गठीत केली जावी आणि त्याचा अहवाल सादर करावा.

या चर्चेत श्री. प्रदिप सावंत यांनी आपले मत मांडताना आणि प्रस्तावाला समर्थन देत विचारले कि, राजकिय दबावाला बळी पडुन आपण मान्यता करीत आहात काय?

प्रा. चंद्रशेखर कुलकर्णी यांनी समर्थन देत सांगितले की, इंजिनिअरींग कॉलेजमध्ये काही मान्यता हया ४ ते ५ दिवसात होतात तर काही मान्यता बरीच वर्ष रखडतात व दुसऱ्या बाजुला प्राचार्यांच्या वर्ष २००० ते २०१० मान्यतेची अशी बरीच प्रकरणे आहेत त्यामुळे समिती गठीत करुन याची चौकशी करावी.

डॉ. सुरेश मैंद यांनीही शिक्षकांच्या मान्यतेच्या व नेमणुकीच्या प्रश्नावर विचारणा केली व एकाच विभागात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याविषयी सुचविले.

श्री. राजन कोळंबेकर यांनी खालिलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यांस श्री. प्रदिप सावंत यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव – ८*

***प्राचार्या श्रीमती डॉ. भावना वैद्य, घनशामदास सराफ महाविद्यालय, मुंबई यांच्या प्राचार्य पदाला विद्यापीठाची मान्यता देण्यात आली, त्यांच्या निवृत्तीच्या एक दिवस अगोदर मान्यता विद्यापीठाने रद्द केली विद्यापीठाच्या या भोंगळ कारभारास जबाबदार कोण? असा असा अनागोंदी कारभाराविरूद्ध सभागृह (१०) दहा मिनिटे तहकुब करण्यात यावी.***

श्री. राजन कोळंबेकर यांनी घनश्यामदास सराफ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना दिलेली मान्यता काढुन घेतल्यानंतर व पुन्हा मान्यता कशी काय दिली याबाबत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली. श्री. शशिकांत झोरे यांनी प्रा. भावना वैद्य यांच्या बाबतीत मान्यतेमधे झालेली नियमबाहयता व इतर प्रलंबित शिक्षकांच्या मान्यता मध्ये दिरंगाई करणाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. श्री. प्रदिप सावंत यांनीही शिक्षकांना मान्यता देणे व मान्यता काढुन टाकणे याबाबत प्रश्न उपस्थित केले. एका समितीवर दुसरी समिती बसविली जाते. मान्यता पुन्हा दिली जाते. या सर्वांची चौकशी करण्याकरीता समिती गठित करण्याची मागणी केली.

प्र-कुलगुरुंनी सांगितले की, सदर विषय व्यवस्थापन परिषदेपुढे आलेला असुन त्यानुसार कारवाई सुरु आहे. शिक्षकांच्या मान्यतेबाबत कोणताही अधिकारी नसुन त्यात एका व्यवस्थेचा भाग

असतो, त्यामुळे कोणाला जबाबदार धरु नका. विद्यापीठात पुर्नरचना सुरु आहे त्यामुळे काही बदल घडतील.

प्रा. वैभव नरवडे यांनी खालिल प्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला आणि श्री. मिलिंद साटम यांनी अनुमोदन दिले.

*<u>स्थगन प्रस्ताव क्र. ५</u>*

*"महाराष्ट्र शासनाची परवानगी असूनही शिक्षक भरती अद्याप सुरू न झाल्याने बहुतांश शिक्षक व प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. याबाबत मुंबई विद्यापीठाने याची गांभीर्याने दखल घेवून सदर सभागृह १० मिनिटे तहकूब करण्यात यावे असा स्थगन प्रस्ताव मी मांडीत आहे."*

<u>प्रा. वैभव नरवडे</u> यांनी महाराष्ट्र शासनाची परवानगी असुनही शिक्षकांची भरती सुरु न झाल्याने बहुतांश शिक्षक व प्रचार्यांची पदे रिक्त असल्याचे सांगितले. ७८६ महाविद्यालयामध्ये ३४५ पदांवर नियमित प्राचार्यांची पदे भरली असुन बाकी सर्व पदे रिक्त आहेत, ही सर्व पदे तातडीने भरण्यात यावीत. शासनाचे परिपत्रक आहे की एकदा ६ महिन्यांची मान्यता दिल्यानंतर फार-फार अजुन ६ महिने वाढवावी परंतु विद्यापीठ वर्षानुवर्षे या पदांना मान्यता देत आहे यामध्ये शासकिय पैशाचे नुकसान होत आहे व त्यामुळे आपण महाविद्यालयांना तशा प्रकारच्या सुचना द्याव्यात व शिक्षक भरती व प्राचार्य भरती करुन घ्यावी. सी.एच.एम. महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या पदांना ६ महिन्याची मंजुरी दिली; प्लॅगरिझमच्या प्रकरणात गुन्हा दाखल झाला; ह्याच प्राचार्यांनी नारी गुरुसहानी विधी महाविद्यालयामध्ये विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला; प्राचार्य म्हणुनही काम करतात व कॉलेजमध्ये ७५% अनुपस्थिती असताना परिक्षेचा फॉर्म कसा स्विकारला जातो; याचा अर्थ ते प्राचार्य पदावर अनुपस्थितीत होते; दोघांपैकी काहीतरी एक प्रवेश अथवा प्राचार्य मान्यता रद्द करायला हवी. कुमार दत्त गाजरे गोयंका कॉलेज ऑफ मॅनेजमेंट हयांची देखील प्राचार्य पदाची मंजुरी राहिलेली आहे. डॉ. स्नेहल दोंदे यांच्या पदाची मान्यता; या सर्वांबाबत तातडीने निर्णय घेण्यात यावा. अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांनी प्राचार्यांची पदे व शिक्षकांची पदे भरण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

कुलगुरुंनी सांगितले की, सी.एच.एम. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नारी गुरूसहानी वि.धी. महाविद्यालयात विधी अभ्यासक्रमासाठी घेतलेले प्रवेश व अभ्यासक्रम कार्यालयीन वेळेत करत असल्याचा आरोप, कुमार दत्त गांजरे, गोयंका कॉलेज ऑफ मॅनेजमेंट यांच्या प्राचार्य पदाची मंजुरी, स्नेहल दोंदे यांच्या प्राचार्य पदाची मंजुरी व इतर महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षकांची पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

सौ. शितल सेठ-देवरुखकर आणि श्री. राजन कोळंबेकर व प्रा. वैभव नरवडे यांनी मांडलेले स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती कुलगुरुंनी केली असता श्रीमती शितल शेठ-देवरुखकर आणि श्री. राजन कोळंबेकर यांनी मा.कुलगुरुंच्या विनंतीला मान देऊन सदर स्थगन प्रस्ताव मागे घेतले.

श्री. प्रदिप सावंत व श्री. सुधाकर तांबोळी यांचे स्थगन प्रस्ताव समान विषयावर असल्यामुळे एकत्रित घेण्याचे ठरले.

श्री. प्रदिप सावंत यांनी पुढीलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास श्री. मिलिंद साटम यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव – १०*

*बिंदुनामावली शासनाकडे सादर करण्यास मुंबई विद्यापीठ प्रशासनाकडुन मागील वीस वर्षे दिरंगाई होत आहे परिणामी विद्यापीठाच्याा शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन फक्त ३०% शासनाकडुन देण्यात येत आहे ७०% म्हणजेच जवळपास ३९० कोटी शासनाकडुन येणे शिल्लक आहे. या सर्व बाबींमुळे सदर वेतन विद्यार्थ्यांच्या शुल्काद्वारे देण्यात येत आहे, शिवाय कोणत्याही प्राधिकरणाची परवानगी न घेता काही कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली आहे याद्वारे विद्यार्थ्यांच्या शुल्क निधीतुन अतिरीक्त वेतन देण्यात येत आहे तरी या उधळपट्टीच्या विरोधात हि सभा १० (दहा) मिनिटे तहकुब करण्यात यावी.*

श्री. प्रदिप सावंत यांच्या प्रस्तावास श्री. मिलिंद साटम तर श्री. सुधाकर तांबोळी यांच्या प्रस्तावास डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

श्री. प्रदिप सावंत यांनी सांगितले की, विद्यापीठाची बिंदूनामावली नियमित नसल्याने शासन विद्यापीठाला वेतनाची देयके देत नाही. यावरुन असे लक्षात येते की, विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी त्यांची जी काही कारकीर्द असते ती पूर्ण करतात पण बिंदूनामावलीच्या प्रश्नाला गांभिर्याने घेत नाहीत. मुंबई विद्यापीठाच्या ९ ते १२ कर्मचाऱ्यांना वर्ग 'क' मधून थेट वर्ग 'अ'मध्ये पदोन्नती दिली, व त्यांचे वेतन विद्यार्थ्यांच्या फंडातूनच होते आहे. शासनाकडुन त्यांची वेतनाची देयके मिळत नाहीत, शासन वारंवार विद्यापीठाला सांगत आहे की रोस्टर नियमित करा, रोस्टर नियमित नसल्या कारणाने देयके मिळत नाही. सन २०१५ साली माननीय राज्यमंत्री रविंद्र वायकर यांनी घेतलेल्या बैठकीत रोस्टरबाबत उच्च व तंत्र शिक्षण खात्यातील उपसचिव श्री. अहिरे यांनी विद्यापीठावर फौजदारी गुन्हा दाखल करा असे म्हटले आहे. दि.२५ फेब्रुवारी, २०१९ ला ज्या पदोन्नत्या दिल्या आहेत याबाबत खुलासा करावा व त्यावर समिती नेमावी.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी खालिलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला व त्यास डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव – ११*

*मुंबई विद्यापीठाचे वेतनासंबंधीचे थकबाकी (रुपये) शासनाकडुन किती येणे बाकी आहे. तसेच **MMRDA** व **BMC** यांच्याकडुन विद्यापीठच्या जागेच्या संदर्भात **FDR** च्या माध्यमातुन किती रुपये येणे बाकी आहे तसेच डेव्हपमेंट फंड माध्यमातुन काही कामे होत आहेत का या बद्दल शंका (संशय) येत असुन याविषयी अधिसभेची सभा १० मिनिटे तहकुब करावी. ही विनंती.*

श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की, मुंबई विद्यापीठाच्या वेतनासंबंधीची शासनाकडुन येणारी थकबाकी वित्तीय वर्ष १९९५ ते २०१९ पर्यंत रु.३३८,७,१०,५३१/- इतकी आहे. तसेच विद्यापीठाला सलग्नतेच्या माध्यमातून मिळणारी शुल्क (फी) व शासनाकडुन येणारी थकबाकी जवळ जवळ सारखीच आहे असे दिसते. तरीही या मुद्यांकडे गांभिर्याने लक्ष घालावे. तसेच अधिसभेच्या बैठकीला शासनाकडून संचालक, उच्च शिक्षण हजर असणे गरजेचे आहे; ते का हजर नाहीत याचे उत्तर द्यावे. दुसरी महत्वाची गोष्ट शासनाची मान्यता न घेता दिलेल्या पदोन्नत्या, सेवानिवृत्त ६५ कर्मचाऱ्यांना अद्याप न मिळालेले निवृत्ती वेतन, आणि २०११ पासुन बिंदुनामावली अद्ययावत न करणे याबाबत निवेदन करावे. एम.एम.आर.डी.ए. ला ८ ते ९ एकर जागा विद्यापीठाने दिली व MOU केला; परंतू त्याबाबतचा मोबदला विद्यापीठाला मिळालेला नाही; एम.एम.आर.डी.ए. चे काम चालू असे पर्यंतच मोबदला मागावा.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी  शासन अनुदानीत पदे व विना-अनुदानीत पदे व हंगामी कर्मचारी यांचे प्रश्न बरीच वर्ष आम्ही मांडत आहोत; परंतू स्थायी कर्मचारी व हंगामी कर्मचारी हे दोन्ही प्रश्न निगडीत आहेत त्यावर वकिलांवरील खर्च वाढत आहे तरी सामंजस्याने हा प्रश्न सोडवावा, असे सुचविले.

प्र-कुलगुरु यांनी एमएमआरडीचा एमओयू ३ वर्षापूर्वी आधीच केलेला होता आणि त्यानंतर बरीच वर्षे तो मुद्दा प्रलंबित राहिला आणि मी चार्ज घेतल्यानंतर हे माझ्या लक्षात आले जे ताबडतोब पुढे नेणे गरजेचे आहे आणि टीडीआर च्या बदल्यात आपल्याला काही एमएमआरडी कडून पैसे मिळणार नाही आहेत. एमएमआरडी जो टीडीआर मिळणार आहे तो विद्यापीठाला विकायला मदत करणार आहे. टीडीआर बद्दल आपल्या सर्वांना कल्पना असेल तर ते शेअर मार्केटसारखे असते की ज्यावेळी तो विकला जातो त्यावेळी जी प्राईज असेल पण एमओयू मध्ये ते गव्हर्नमेंटने एमएमआरडीकडून मान्य करुन घेतले आहे की विद्यापीठाला विद्यापीठाच्या डेव्हलपमेंटसाठी आवश्यक सगळी मदत, मास्टर प्लॅन करण्यापासून करावी असे नमूद केलेले आहे. त्यांच्यामागे मी सतत मागे आहे २ ते ३ मिटींग झाल्या आणि त्यातून त्यांनी पहिले टेंडरही काढलेल आहे; मास्टर प्लॅन करण्याची ती प्रक्रिया सुरु आहे. त्यानंतर बोर्ड ऑफ कंडक्ट थांबलेले आहे त्यांना विनंती केली आहे की विद्यापीठात नॅक ची समिती येणार आहे त्यासाठी आतल्या काही गोष्टी रिपेरिंग करणे गरजेचे आहे. त्या तात्काळ होतील. तर त्या निमित्ताने रस्त्याचे काम सुरु झालेले आहे आणि त्यांच्या मागे लागून जिथे जिथे आवश्यक भासेल तिथे तुमची सर्वांची मदत घेऊन हे काम लवकरात-लवकर एमएमआरडीकडून करुन घेणे जरुरीचे आहे व परत इथे अधिक चर्चा करु नये अशी विनंती केली.

श्री. रुपेश मालुसरे यांनी आता पर्यंत या विषयावर चार समित्या स्थापन झाल्या आहेत; परंतू आता फक्त एक संयुक्त बैठकीची गरज आहे, त्यामध्ये आस्थापना विभाग १,२,३,४ व वित्त व लेखा विभाग, विशेष कक्ष, पॉव्हिडंट फंड व पेंशन विभाग यांचा समावेश असावा व कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घ्यावी म्हणजे हा विषय सुटू शकेल व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना न्याय मिळेल असे सांगितले.

डॉ. सुप्रिया करंडे यांनी शासनाच्या टास्क फोर्स समितीने जे स्पष्टीकरण मागितले हे बरेच दिवस विद्यापीठाला समजलेच नाही, कोणती कागदपत्रे द्यावयाची आहेत हे देखील कळलेले नाही. तेव्हा जोपर्यंत त्यांनी मागितलेली माहिती व कागदपत्रे विद्यापीठ देत नाही तोपर्यंत थकबाकी मिळणार नाही त्यामुळे आपल्याला प्रयत्न करावे लागतील, असे सांगितले.

श्री. जगताप यांनी बिंदूनामावलीचा प्रश्न २०१३-१४ पर्यंत संपला असे सांगितले पण २०११ पर्यंत जर रोस्टर प्रमाणित असेल तर २० वर्ष हा प्रश्न का सुटलेला नाही, अशी विचारणा केली.

कुलसचिव यांनी २०११ पर्यंत बिंदुनामावल्या प्रमाणित केलेल्या आहेत, असे सांगितले.

श्री. तांबोळी यांनी बिंदूनामावली २०११ पर्यंत पूर्ण झालेली आहे; परंतू शासनाकडुन जी थकबाकी येणे आहे, ती थकबाकी आली का? २०११ पासून पुढील रोस्टर प्रलंबित आहे आणि जोपर्यंत बिंदूनामावली तयार होत नाही तोपर्यंत थकबाकी मिळणार नाही. याबाबत विद्यापीठाने निवेदन करावे, असे सांगितले.

वित्त व लेखा अधिकारी यांनी १९९५ पासून जी काही थकबाकी शासनाकडुन येणे बाकी आहे त्याबाबत यापूर्वी पत्रव्यवहार झाला आहे. गेल्या ६ महिन्यात ३ पत्र शासनाला पाठविले आहेत. आपण पहिल्यांदा ७०४ लोकांचे स्टॅपिंग करुन त्यांना सेवार्थवरती घेणे हे पहिले काम आहे. जेवढे लवकरात लवकर हे काम हाईल तितक्या लवकर जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांचे १००% वेतन मिळेल. कुलसचिवांनी सांगितल्याप्रमाणे चार स्तरावर प्रयत्न सुरु केले आहेत. ज्या-ज्या वर्षाची बिंदुनामावली प्रमाणित नसेल तर ती प्रमाणित करुन घ्यावी. ज्या कर्मचाऱ्यांबाबत शासनाने मुद्दे उपस्थित केले आहेत त्यांची पुर्तता करणे व स्टॅम्पिंग करुन सेवार्थवर आणणे, असे स्पष्ट केले.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की, विद्यापीठ अनुदान व शासन अनुदान यामध्ये तीढा निर्माण झाला आहे, त्यामुळे सर्वसाधारण निधीवर अतिरिक्त भार पडला असुन बॅंकेतले पैसे संपेपर्यंत वाट बघु नका.

सदर चर्चेत श्री. महादेव जगताप व प्राचार्य कुऱ्हाडे यांनी सहभाग घेतला.

कुलसचिव यांनी असे सांगितले की, कुलगुरू व प्र-कुलगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली आस्थापना विभाग १/३, २/४, वित्त व लेखा विभाग, विशेष कक्ष, प्रोव्हिडंट फंड विभाग, पेंशन विभाग यांची टास्क फोर्स अहवालाच्या अंमलबजावणीसाठी गठीत केलेली समिती यांसर्वांची संयुक्त बैठक लावण्यात येईल व बिंदुनामावलीचा प्रश्न कसा मार्गी लागेल व शासनाकडून आपल्याला थकीत रक्कम कशी प्राप्त होईल यासाठी प्रयत्न करण्यात येईल. यासंदर्भात अधिसभा सदस्यांचे व बिंदू नामावलीच्या कामामधील तज्ज्ञांचे सहकार्य घेतले जाईल.

कुलगुरु यांनी २५ फेब्रुवारी, २०१९ ला जे पदोन्नतीचे आदेश निघाले त्यानुसार डेटा एन्ट्री ऑपरेटरला वर्ग-क मधून वर्ग-अ सिस्टम ऑपरेटर ऑफिसर मध्ये पदोन्नती देता येते का? याबाबत शासन निर्णय आहे का ते तपासून व इतरही काही आवश्यक असल्यास तपासण्यात येईल व अश्या पदोन्नत्या देताना त्या प्रथम व्यवस्थापन परिषदेत ठेऊन मगच निर्णय घेतला जाईल, असे सांगितले.

वरिल आश्वासनानंतर श्री. सुधाकर तांबोळी व श्री. प्रदिप सावंत यांनी मांडलेले स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती कुलगुरुंनी केली असता श्री. सुधाकर तांबोळी व श्री. प्रदिप सावंत यांनी त्यांचे स्थगन प्रस्ताव मागे घेतले.

श्री. सुधाकर तांबोळी यांनी खालिल स्थगन प्रस्ताव मांडले त्यास डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव क्र. १२*

*मुंबई विद्यापीठातील परिक्षा विभागातील भोंगळ कारभाराबाबत अधिसभेची ही सभा १० मिनिटे तहकुब करावी. हि विनंती.*

*स्थगन प्रस्ताव क्र. १३*

*मुंबई विद्यापीठ-कलिना संकुल (कॅम्पस) मधील काही प्रश्न उदा: हॉटेल/कॅन्टीन नवीनक्र/जुन्या शैक्षणिक इमारतीसंबधी यासाठी अधिसभेची सभा १० मिनिटे तहकुब करावी. ही विनंती.*

श्री. सुधाकर तांबोळी यांनी सांगितले की बी.के.सी. पोलिस चौकीमध्ये विद्यापीठाबाबत अनेक केसेस प्रलंबित असतात व त्यांच्याकडून याचा पाठपुरवठा होत नाही. परिक्षा विभागामध्ये विविध खोट्या गुणपत्रिकेच्या केससमुळे परिक्षा विभागाचा कारभार भोंगळ झाला आहे. खोटया प्रकरणाबाबतच्या तक्रारींना उत्तर दिले जात नाही.

श्री. प्रदीप सावंत यांनी परिक्षा विभागामधील फर्निचरचा विषय मांडताना परिक्षा भवनासाठी बांधण्यात आलेली नविन इमारत व परिक्षा विभागातले स्थलांतर कधी करणार असा मुद्दा उपस्थित केला. उत्तरपत्रिकेच्या बाबत ते म्हणाले की मागच्या वर्षीच्या व यावर्षीच्या आर्थिक उलाढालीमध्ये तफावत दिसत आहे.

प्राचार्य डॉ. अजय भामरे यानी पदवी प्रमाणपत्रातील नावांमध्ये काही चुका असल्याने विद्यार्थ्यांना नाहक आर्थिक व मानसिक त्रास होतो. अशा चुका टाळण्यासाठी परिक्षा विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे, असे सांगितले.

श्री. तांबोळी यांनी कोकाकोला बरोबर केलेल्या करारामधुन ८०० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन सुध्दा त्यांना प्रमाणपत्र मिळाले नाही असा मुद्‌दा उपस्थित केला.

*श्री. सुधाकर तांबोळी यांच्या स्थगन प्रस्तावाच्या अनुषंगाने, कुलगुरु म्हणाले की आयडॉल दुरस्थ शिक्षण संदर्भातील सदस्यांचे जे काही प्रश्न लेखी स्वरूपात येतील त्यासंदर्भात व इतर प्रश्नांबाबत संबंधीत सदस्यांची विशेष बैठक आयोजित करण्यात येईल जेणेकरून सर्व प्रश्नांची उत्तरे अधिकाअधिक चर्चा करून देता येतील. खोटया पदवी प्रकरणातील तक्रारींवर त्वरीत पोलिस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात येऊन पाठपुरावा केला जाईल. कोकोकोला बरोबर केलेल्या करारानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या कोर्स प्रमाणे असोशिएट डिग्री दिली जाईल; परंतू यु.जी.सी. तर्फे असोशिएट डिग्री ही संकल्पना अजुनही आलेली नाही. एखादी डिग्री देऊन रदद्‌बादल होणे योग्य नसल्यामुळे यु.जी.सी. कडे चौकशी करणे सुरु आहे. UGC ची उत्तर आल्यानंतर संबंधीत सदस्यांना कळविण्यात येईल. श्री. सुधाकर तांबोळी यांनी विद्यापीठातील अनेक प्रश्नांसंबधी पत्रव्यवहार केलेला आहे. परंतु त्या पत्रांची (प्रश्नांची) उत्तरे दिली नसतील तर ती त्वरीत देण्यात येतील. उदा. दुरस्थ शिक्षण संस्था, परिक्षा विभाग, शिक्षक नियुक्ती विभाग, सामान्य प्रशासन विभाग (कलिना) इत्यादी.*

वरिल आश्वासनानंतर श्री. तांबोळी यांनी मांडलेले स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती कुलगुरुंनी केली असता श्री. तांबोळी यांनी मा.कुलगुरुंच्या विनंतीला मान देऊन सदर स्थगन प्रस्ताव मागे घेतले.

डॉ. सुरेश मैंद यांनी खालिल स्थगन प्रस्ताव मांडला त्यास श्री. धनराज कोहचाडे यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव क्र. १४*

***उपलब्ध शिक्षक निवासस्थाने, शिक्षकांना वेळेत न दिल्याने, शिक्षकांचे शैक्षणिक व आरोग्यविषयक नुकसान होत आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. याकरिता अधिसभा सभागृह १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात यावे.***

डॉ. सुरेश मैंद यांनी शिक्षकांना दिल्या जाणा-या कल्याणकारी योजना विद्यापीठ प्राध्यापकांना योग्य त्या प्रकारे लागु केल्या जात नाहीत व त्यांच्या पेंनशनचे प्रस्ताव अजुनही प्रलंबित असल्याचे सांगितले. तसेच विद्यापीठाला शासनाकडून शेकडो कोटी येणे आहे त्याला विद्यापीठ प्रशासन जबाबदार असल्याचे ते म्हणाले. शिक्षकांना निवासस्थान वेळेवर न मिळाल्याने प्रतिक्षा यादी प्रत्यक्षात ५४ वर गेली आहे. तसेच त्यांनी सोलार ऐनर्जी व वसतीगृहाबाबत प्रश्न उपस्थित केला.

मा. कुलगुरुंनी सदर मुद्यांवर तात्काळ लक्ष घालुन कार्यवाही करण्यास सुरुवात झालेली आहे असे सांगितले.

वरिल चर्चेच्या अनुषंगाने मा.कुलगुरुंनी आश्वासित केले की, शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन लवकर मिळण्यासंदर्भात, शिक्षकांच्या कल्याणकारी योजना, शिक्षकांचे निवासस्थान उपलब्धता व सुविधा या संदर्भात तात्काळ लक्ष घालून कार्यवाही करण्यात येईल. आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासंदर्भातील

प्रस्तावावर चर्चा करून निणर्य घेण्यात येईल. सोलार संदर्भात एका एजन्सीशी बोलणे सुरू असुन शक्य तितक्या लवकर सोलार एनर्जी बाबत निर्णय घेण्यात येईल.

वरिल आश्वासनानंतर डॉ. सुरेश मैंद यांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती कुलगुरुंनी केली असता डॉ. सुरेश मैंद यांनी त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेतला.

श्री. निखिल जाधव यांनी खालिल प्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला आणि श्री. मिलिंद साटम यांनी अनुमोदन दिले.

*स्थगन प्रस्ताव क्र. १६*

***"This is to draw your attention to very serious and important issue faced by the students that needs to urgent attention. The students of various colleges are facing difficulty in coping up with the different procedures as a student, be it society pressure, admission pressure, fear pressure, parents' pressure, pressure from subordinate and competition".***

*श्री. निखिल जाधव यांनी खालिल प्रमाणे निवेदन केले :-*

***India is expanding 0.06% on mental health crisis which is far much less than Bangladesh i.e. 0.44% as per statistics. Maharashtra is leading State in the maximum number of students' suicide as per NCRB report 2016.***

***It's a humble request that the University should take this issue on serious note and pass a rule of having a compulsory counseling Centre in every college with a professional psycatrist Even in the University Campus. This will help disturbed students to have a professional mental help and may be avoided emergency circumstances.***

***Sir if we are able to save even one life we save India tomorrow.***

श्री. निखिल जाधव यांनी विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य विविध कारणांमुळे धोक्यात आले असल्याचे सांगुन सर्व महाविद्यालयात समुपदेशन केंद्र स्थापन करणे आवश्यक आहे अशी सूचना केली.

कुलगुरुंनी सदर सूचना व प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठाला चांगले सहकार्य होईल असे सांगितले.

मा. कुलगुरुंनी श्री. निखिल जाधव यांना त्यांचा स्थगन प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन श्री. निखिल जाधव यांनी त्यांचा प्रस्ताव मागे घेतला.

चर्चेच्या अनुषंगाने कुलगुरुंनी सांगितले की, सन्माननीय अधिसभा सदस्य यांना फोर्ट परिसरात बसण्यासाठी एका कक्षाची व्यवस्था करण्याबाबत प्राथमिक स्तरावर कार्यवाही सुरु आहे व कलिना परिसरात पर्न:विकास सुरु होईल त्यावेळी अशा कक्षास प्राधान्याने जागा देण्यात येईल तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ यावर प्राधिकरण सदस्यांसाठी प्राधान्याने चर्चासत्र घेण्यात येईल.

**बाब क्र.३ : मुंबई विद्यापीठाच्या सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१८-२०१९ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज, अधिसभेच्या स्वीकृती व मान्यतेस्तव सादर.**

प्राचार्य अजय भामरे, प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा यांनी खालीलप्रमाणे ठराव मान्यतेसाठी व स्विकृतीसाठी सादर केला. त्यास प्रा. गुलाबराव राजे यांनी अनुमोदन दिले.

"१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २९(जी) नुसार व्यवस्थापन परिषदेने सादर केलेल्या वार्षिक वित्तीय विवरणाचा (ज्यात २०१९-२०२० या वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१८-२०१९ वर्षाचा सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज यांचा समावेश आहे) विचार अधिसभेने करावा.

२) वार्षिक वित्तीय विवरणामध्ये तपशीलवार दिलेले सन २०१९-२०२० या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज तसेच २०१८-२०१९ या वर्षाचे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज विचारत घेऊन स्विकृत आणि संमत करावे."

प्राचार्य डॉ. भामरे यांनी अंदाजपत्रक मांडणीचा इतिहास थोडक्यात वर्णन करुन अर्थसंकल्पावरील सूचना सादर करण्याविषयी विनंती केली.

श्री. संजय शहा, वित्त व लेखा अधिका-यांनी प्रस्तुत अर्थसंकल्प तीन भागात सादर केल्याचे सांगितले.

भाग १ व २ - परिक्षण व विकास

भाग ३ - स्वतंत्र प्रकल्प योजना व सहयोगी उपक्रम अध्ययन केंद्र/राज्य शासन/वि.अ.आयोग व अन्य संस्था - आर्थिक सहाय योजना.

प्राचार्य डॉ. भामरे यांनी मान्यतेसाठी व स्विकृतीसाठी सादर केला.

प्राचार्य डॉ. भामरे यांनी अर्थसंकल्पावर केलेले भाषण सोबत जोडले आहे. **(परिशिष्ट-१)**

श्री. प्रदीप सावंत, श्री. महादेव जगताप, श्री. सुधाकर तांबोळी, प्रा. वैभव नरवडे, प्रा. मुरलीधर कु-हाडे, डॉ. मृदुल निळे यांनी चर्चेत सहभाग घेतला.

सन्माननीय सदस्यांनी सादर केलेल्या दुरुस्त्यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. **(परिशिष्ट-२)**

मा. कुलगुरुंनी दुरुस्ती मांडण्यासाठी सदस्यांचे नाव पुकारले व सदस्यांनी खालिलप्रमाणे त्यांच्या दुरुस्त्या मांडल्या.

## दुरुस्ती क्र. १

डॉ. संगीता पवार यांनी खालिलप्रमाणे दुरुस्त्या मांडली आणि श्री. मृदुल निळे यांनी अनुमोदन दिले.

डॉ. संगीता पवार यांनी एकुण १९९ दुरुस्त्या सादर केल्या होत्या त्यातील प्रामुख्याने पुढील प्रमाणे दुरुस्त्या मांडल्या. बाह्य संस्थावर आपली अवलंबितता वाढत चालली आहे; हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटचा खर्च बाढत चालला आहे तो ही कमी करावा; चतुर्थ श्रेणी कर्मचारी तुटपुंज्या पगारावर काम करतात त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करावी; विद्यार्थ्यांनकडून e-charge वसुल करतो पण त्यांना e-service न देणे; इत्यादी तसेच एफ. एम. क्युमिटी रेडिओ, हेल्थ सेंटर त्याचप्रमाणे WDC अभ्यासक्रमाची मागणी त्यांनी लावुन धरली.

मा. कुलगुरुंनी सूचना व दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगुन डॉ. संगीता पवार यांना त्यांची दुरुस्ती मागे घेण्याची विनंती केली. डॉ. संगीता पवार यांनी मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन दुरुस्ती मागे घेतली.

## दुरुस्ती क्र. २

प्रा. वैभव नरवडे यांनी एकुण १९ दुरुस्त्या सादर केल्या होत्या त्यातील प्रामुख्याने खालिल प्रमाणे दुरुस्त्या मांडल्या आणि डॉ. सुप्रिया करंडे यांनी अनुमोदन दिले.

प्रा. वैभव नरवडे यांनी त्रृटींचा अर्थसंकल्प होऊ शकत नाही असे म्हणणे मांडले. विद्यापीठाची स्थावर मालमत्ता काळजीपुर्वक जपली पाहिजे, जमाखर्चाबाबत जागरुक राहणे आवश्यक असुन उत्तरपत्रिका रद्दीच्या विक्रीवर देखरेख व नियंत्रण आवश्यक आहे. विद्यापीठाची गोडाऊन भाड्याने देण्यासंदर्भात गोडाऊन भाडे अंदाजित करणे; शहिद झालेले पोलिस अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी तरतुद खर्च झालेली नाही; अभियांत्रिकी अध्यासनासाठी शिबिरे, चर्चासत्र, परिषदा आयोजित केले नसल्याचे तसेच जमनालाल बजाज इन्सिटयुटच्या बाबत आकस्मिक निधी थोर संताच्या नावाने अभ्यास करण्यासाठी अध्यात्मीक अध्यात्मक केंद्र असावे; अशी मागणी केली.

श्री. डि. पी. मेहता, वित्त व लेखा अधिकारी यांनी चर्चेत भाग घेतला.

मा. कुलगुरुंनी सूचना व दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगुन प्रा. वैभव नरवडे यांना त्यांची दुरुस्ती मागे घेण्याची विनंती केली. प्रा. वैभव नरवडे यांनी मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन दुरुस्ती मागे घेतली.

## दुरुस्ती क्र. ३

प्रा. प्रकाश दातार यांनी एकुण ५ दुरुस्त्या सादर केल्या होत्या त्यातील प्रामुख्याने खालिल प्रमाणे दुरुस्त्या मांडल्या आणि डॉ. निशा मुनी यांनी अनुमोदन दिले.

प्रा. दातार यांनी मुलींच्या वसतिगृहासंबधात कोणताही खर्च झाला नसल्याचे; उत्तरपुस्तिका व प्रश्नपत्रिका, बारकोड व स्टीकर यासाठी करण्यात आलेल्या तरतुदींवर आक्षेप घेताना प्रश्नपत्रिका महाविद्यालयांमध्ये छपाई होत असताना किंमत काढणे, पदव्युत्तर शिष्यवृत्ती व संशोधन केंद्राची अवस्था आधिच विदारक असल्याचे सांगितले.

मा. कुलगुरुंनी सूचना व दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगुन प्रा. प्रकाश दातार यांना त्यांची दुरुस्ती मागे घेण्याची विनंती केली. प्रा. प्रकाश दातार यांनी मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन दुरुस्ती मागे घेतली.

## दुरुस्ती क्र. ४

श्री. राजन कोळंबेकर यांनी एकुण १२ दुरुस्त्या सादर केल्या होत्या त्यातील प्रामुख्याने खालिल प्रमाणे दुरुस्त्या मांडल्या आणि डॉ. धनराज कोहचाडे यांनी अनुमोदन दिले.

श्री. राजन कोळंबेकर यांनी मोबाईल लायब्ररीसाठी पाच लाख प्रस्तावीत केले आहेत पण ते अस्तित्वात नाही, विद्यार्थी कल्याण निधीमधुन एस.सी./एस.टी. विद्यार्थ्यांची आर्थिक मदत वाढावावी, सिंधु स्वाध्यायाची तरतुद वाढविण्याबद्दल सूचविले.

मा. कुलगुरुंनी सूचना व दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगुन श्री. राजन कोळंबेकर यांना त्यांची दुरुस्त्या मागे घेण्याची विनंती केली. श्री. राजन कोळंबेकर यांनी मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन दुरुस्त्या मागे घेतल्या.

## दुरुस्ती क्र. ५

श्री. प्रदिप सावंत तातडीच्या अपरिहार्य कारणास्तव निघून गेल्याने दुरुस्ती मांडण्यात आली नाही.

## दुरुस्ती क्र. ६

श्रीमती. शितल सेठ-देवरुखकर तातडीच्या अपरिहार्य कारणास्तव निघून गेल्याने दुरुस्ती मांडण्यात आली नाही.

## दुरुस्ती क्र. ७

डॉ. आरती प्रसाद यांनी एकुण ६ दुरुस्त्या सादर केल्या होत्या त्यातील प्रामुख्याने खालिल प्रमाणे दुरुस्त्या मांडल्या आणि डॉ. अनंत लोखंडे यांनी अनुमोदन दिले.

डॉ. आरती प्रसाद यांनी सहा दुरुस्त्या एकत्रितपणे मांडल्या त्यात प्रामुख्याने सावित्रिबाई मुलींचे वसतिगृहाच्या संदर्भात आवश्यक सेवा-सुविधा, उदा. फर्निचर टेलीव्हिजन सेंटर, पाण्याची व्यवस्था उपलब्ध करण्यात यावी तसेच जगन्नाथ शंकर शेठ हॉस्टेलची तातडीने दुरुस्ती करणे, सी.सी.टी.व्ही. बसविणे, वायफाय कनेक्शन आणि स्वच्छता यांचा अनुक्रमाने विचार करणे, महर्षी केशव धोंडे कर्वे मुलींचे वसतीगृह व इंटरनॅशनल स्टुडंट हॉस्टेलची दुरुस्ती आवश्यक असल्याचे नमुद केले. कर्मवीर भाऊराव पाटील मुलांचे वसतीगृह दुरुस्तीसाठी बंद आहे, थोडक्यात आठ वसतीगृहांपैकी ५० टक्के वसतिगृह बंद असल्याचे सांगितले.

मा. कुलगुरुंनी सूचना व दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगुन डॉ. आरती प्रसाद यांना त्यांची दुरुस्त्या मागे घेण्याची विनंती केली. डॉ. आरती प्रसाद यांनी मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन दुरुस्त्या मागे घेतल्या.

## दुरुस्ती क्र. ८

डॉ. निशा मुनी यांनी एकुण ३ दुरुस्त्या सादर केल्या होत्या त्यातील प्रामुख्याने खालिल प्रमाणे दुरुस्त्या मांडल्या आणि डॉ. प्रकाश दातार यांनी अनुमोदन दिले.

डॉ. निशा मुनी यांनी पी. जी. रिसर्च स्कॉलरशिपसाठी १०,०००/- रुपयाची तरतुद अत्यंत तुटपुंजी असुन ती वाढवीली पाहीजे. CAP भत्ता मागील वर्षी १ कोटी ५० लाख तर आता ७ कोटी ५० लाख दाखविलेला असून झालेली वाढ खुपच जास्त आहे त्यामुळे त्यांचे सुयोग्य अंदाजपत्रक करावे, अशी सुचना केली.

श्री. महादेव जगताप यांनी डॉ. निशा मुनी यांचा मुद्दा विषद करताना विद्यार्थी वसतिगृहाचे भाडे कमी प्रमाणात आकारले जावे. चर्चासत्र व शिबिर आयोजनासाठी निधी उपलब्ध करुन दिले पाहिजे, असे सांगितले. यावर वित्त व लेखा अधिकारी यांनी व्यवसायिक तत्वाचा अवलंब करुन हा प्रश्न सोडविता येईल, असे सांगितले.

मा. कुलगुरुंनी सूचना व दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगुन डॉ. निशा मुनी यांना त्यांची दुरुस्त्या मागे घेण्याची विनंती केली. डॉ. निशा मुनी यांनी मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन दुरुस्त्या मागे घेतल्या.

## दुरुस्ती क्र. ९

श्री. महादेव जगताप यांनी एकुण २३ दुरुस्त्या सादर केल्या होत्या त्यातील प्रामुख्याने खालिल प्रमाणे दुरुस्त्या मांडल्या आणि श्री. राजन कोळंबेकर यांनी अनुमोदन दिले.

श्री. महादेव जगताप यांनी आयडॉलमध्ये उपलब्ध असलेले साहित्य ग्रामीण भागामध्ये विद्यार्थ्यांना ना नफा ना तोटा तत्वावर उपलब्ध करुन दिले पाहिजे आणि रत्नागिरी उपपरिसरामध्ये ब-याचश्या सुविधांचा प्रश्न आहे, पाणी, विज, स्वच्छता इत्यादी. UMLA या अभ्यासक्रमांना बार कॉन्सीलची मान्यता आहे का? याचा खुलासा करण्याची मागणी करुन अभ्यासक्रमांना असलेल्या ५०,०००/- रुपयांच्या बदल्यात एवढया सुविधा दिल्या जातात का? असेही विचारले.

मा. कुलगुरुंनी सुचना व दुरुस्त्यांवर सकारात्मक विचार करण्यात येईल असे सांगुन श्री. महादेव जगताप यांना त्यांची दुरुस्त्या मागे घेण्याची विनंती केली. श्री. महादेव जगताप यांनी मा. कुलगुरुंच्या विनंतीस मान देऊन दुरुस्त्या मागे घेतल्या.

## दुरुस्ती क्र. १०

